RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com  Vidabh Kesari News  90969 45629  @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
९ गुरुवार एप्रिल २०२६
✲ वर्ष ५ ✲ अंक ३१३
✲ पृष्ठ : ६ ✲ मूल्य रु : ३

## उभ्या ट्रकवर दुचाकी धडकून दोन युवक ठार

**▸विदर्भ केसरी। नागपूर,**

रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकवर भरधाव दुचाकी धडकली. या विचित्र अपघातात दोन युवक ठार झाले तर दोघे गंभीर जखमी झाले. जखमींवर मेडिकल रुग्णालयात उपचार सुरु आहे. हा अपघात मंगळवारी रात्री अकरा वाजताच्या सुमारास कळमना पोलिस ठाण्याच्या हद्दीतील भरतनगर ते विजयवाडा रोडवर लक्ष्मीनगर चौकात घडला. सूरज भागवत रात्रे (22) आणि बलवंत धीरज बंजारे (40) अशी अपघातात ठार झालेल्या युवकांची नावे आहेत. तर देवदास गरीबदास जांगळे (23) आणि महेंद्र दिलीप खिलाडे (25) अशी जखमींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री 10.30 वाजता देवदास गरीबदास जांगळे (23) आणि त्यांचे तीन मित्र सूरज भागवत रात्रे (22), महेंद्र दिलीप खिलाडे (25) आणि बलवंत धीरज बंजारे (40) हे एका लग्न समारंभातून परतत होते. चौघेही एकाच दुचाकीवर (एमएच 49 सीव्ही 3670) प्रवास करत होते. लक्ष्मीनगर चौकातील लाल स्कूलजवळ सार्वजनिक रस्त्यावर एक आयसर ट्रक (सीजी 08 एएस 8755) कोणतीही खूण लावून न ठेवता रस्त्याच्या कडेला उभा होता. भरधाव दुचाकीची या ट्रकच्या मागील भागाला जोरदार धडक बसली. ही धडक इतकी भीषण होती की, दुचाकीस्वार थेट ट्रकखाली घुसले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ जखमींना रुग्णालयात हलवले. सूरज रात्रे आणि बलवंत बंजारे यांना मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. देवदास जांगळे आणि महेंद्र खिलाडे हे गंभीर जखमी असून, त्यांच्यावर मेडिकल रुग्णालयातील ट्रॉमा सेंटरमध्ये उपचार सुरू आहेत. दरम्यान, रस्त्यावर ट्रॅफिकचे नियम धाब्यावर बसवून आणि धोकादायक स्थितीत ट्रक उभा केल्यामुळे हा अपघात घडला,

# युद्धविरामानंतर इस्त्रायलचा भीषण हल्ला

## थेट 50 फायटर जेट मैदानात, एकाचवेळी 160 बॉम्ब हल्ले, अनेकांचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी।**




अमेरिका इस्त्रायल आणि इराणमध्ये भीषण युद्ध सुरू होतं, अखेर युद्धाच्या 40 व्या दिवशी युद्धविराम झाला आहे. बुधवारी इराण आणि अमेरिकेकडून युद्धविरामाची घोषणा करण्यात आली. इस्त्रायलने देखील अमेरिकेला समर्थन देताना युद्धविराम झाल्याचं सांगितलं. अमेरिका आणि इराणकडून दोन आठवड्याच्या युद्धविरामाला मान्यता देण्यात आली. या दरम्यान अमेरिका आणि इराणमध्ये चर्चा होणार आहे. इराणने स्ट्रीट ऑफ होर्मूज तातडीने खुला करावा अशी अट अमेरिकेनं इराणसमोर ठेवली होती. इराणने ती अट देखील मान्य केली आहे. दरम्यान या युद्धविरामासाठी पाकिस्तानने पुढाकार घेतला होता.

युद्धविराम होऊन अजून 24 तास देखील झाले नाहीत, तोच आता मोठी बातमी समोर आली आहे. पाकिस्तानने जेव्हा इराण, इस्त्रायल आणि अमेरिकेपुढे युद्धविरामाचा प्रस्ताव ठेवला होता, तेव्हा त्यामध्ये इस्त्रायल लेबनॉनवर देखील हल्ले करणार नाही, अशी एक अट होती. मात्र इस्त्रायलने पाकिस्तानची ही अट फेटाळून लावली आहे. आमचा युद्धविराम हा फक्त इराणशी आहे, आम्ही लेबनॉनवर हल्ले सुरूच ठेवणार असं इस्त्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी म्हटलं होतं. युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर अवघ्या 24 तासांमध्येच इस्त्रायलने लेबनॉनवर भीषण हल्ला केला आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार इस्त्रायलने 50 फायटर जेटच्या मदतीने लेबनॉनवर भीषण हल्ला केला आहे. यावेळी इस्त्रायलकडून तब्बल 160 बॉम्ब हल्ले करण्यात आले असून, हिज्बुल्लाहाच्या ठिकाणांना टार्गेट करण्यात आलं. इस्त्रायलच्या या हल्ल्यामध्ये 100 पेक्षा अधिक हिज्बुल्लाह संघटनेचे सदस्य मारले गेल्याची माहिती समोर येत आहे. या हल्ल्यामध्ये लेबनॉनचे अनेक सामान्य नागरिक मारले गेल्याची माहिती देखील समोर येत आहे. अनेक जण या हल्ल्यात जखमी झाले आहेत. हा हल्ला एवढा भीषण होता की, आता लेबनॉनचे पंतप्रधान नवाफ सलाम यांनी या हल्ल्याविरोधात आपल्या मित्र राष्ट्रांची मदत मागितली आहे. आम्ही युद्धविरामाचं स्वागत करतो, परंतु इस्त्रायलचे आमच्यावर हल्ले सुरूच आहेत. हे हल्ले थांबवण्यासाठी आम्हाला मदत करा असं साकडं आता लेबनॉनच्या पंतप्रधानांनी आपल्या मित्र राष्ट्रांना घातलं आहे, तर दुसरीकडे इराणने देखील लेबनॉनवरील हल्ले थांबवण्याची मागणी केली आहे, जर हल्ले थांबले नाहीत तर आम्ही युद्धविराम तोडू अशी धमकी देखील त्यांनी दिली आहे. त्यामुळे आता हे युद्ध पुन्हा एकदा भडकण्याची शक्यता आहे.

### इराणने अमेरिकेला 10 मुद्द्यांचा आराखडा पाठवला

- **ट्रम्प यांनी सांगितले की, इराणने अमेरिकेला 10 मुद्द्यांचा आराखडा पाठवला आहे. ते म्हणाले की, यावर पुढे चर्चा केली जाऊ शकते.**
- **तर, इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेने दावा केला आहे की, अमेरिकेने त्यांचा 10 मुद्द्यांचा प्रस्ताव स्वीकारला आहे. परिषदेनुसार, हा करार इराणच्या अटींवर झाला आहे आणि याला देशाचा विजय म्हटले आहे.**

## ८ तारखेला १ हजार प्रश्नपत्रिका जळाल्या

**▸विदर्भ केसरी। औंढा नागनाथ (जि.हिंगोली) :**

तालुक्यातील पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील निष्काळजीपणाचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, पॅट (पिरॉडिक असेसमेंट टेस्ट) परीक्षेच्या १ हजार प्रश्नपत्रिका जळून खाक झाल्याची घटना ८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

या घटनेमुळे ११ एप्रिल रोजी होणाऱ्या मराठी विषयाच्या परीक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने प्राप्त झालेल्या प्रश्नपत्रिका पंचायत समितीच्या शिक्षण विभागात ठेवल्या होत्या. याच ठिकाणी असलेल्या इन्व्हर्टर व यूपीएसमध्ये विद्युत दाब कमी-जास्त झाल्याने अचानक शॉर्टसर्किट झाले आणि त्यातून लागलेल्या आगीत या प्रश्नपत्रिका जळून खाक झाल्या. विशेष म्हणजे, या प्रश्नपत्रिकांचे वितरण ८ एप्रिललाच होणार होते. मात्र, घटनेमुळे संपूर्ण नियोजन कोलमडले आहे.

परीक्षेच्या नियोजित वेळापत्रकानुसार ११ एप्रिल रोजी मराठी, १५ एप्रिल रोजी इंग्रजी आणि २२ एप्रिल रोजी गणित विषयाची परीक्षा होणार आहे. मात्र आता नव्याने प्रश्नपत्रिका उपलब्ध करण्याचे मोठे आव्हान शिक्षण विभागासमोर आहे. पुणे येथून या प्रश्नपत्रिका मागवणे अल्पावधीत शक्य नसल्याने प्रशासन अडचणीत आले आहे. तसेच बाहेरून झेरॉक्स काढल्यास प्रश्नपत्रिका फुटण्याचा धोका असल्याने पर्याय मर्यादित आहेत.या प्रकारामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. प्रश्नपत्रिका ठेवण्याच्या ठिकाणी योग्य सुरक्षा व्यवस्था नसणे व विद्युत यंत्रणांची तपासणी न करणे हे गंभीर दुर्लक्ष मानले जात आहे. पॅट परीक्षेद्वारे विद्यार्थ्यांची उपस्थिती व बोगस नोंदी तपासण्याचे उद्दिष्ट होते. मात्र, या घटनेमुळे शिक्षण विभागाच्या नियोजनावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

- **तिसरी ते सहावी वर्गापर्यंतच्या १ हजार प्रश्नपत्रिका आगीत जळाल्या. प्राथमिक शिक्षण परिषद, पुणे यांच्याशी संपर्क साधला असून, दोन दिवसात प्रश्नपत्रिका मिळतील आणि मिळाल्या नाहीच तर झेरॉक्स काढून परीक्षा घेण्यात येईल. - मोहम्मद तौसिफ, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औंढा नागनाथ.**

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे

!! पाहिजेत !!

**कार्यालय व्यवस्थापक** (Office Manager)
'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.

पात्रता आणि आवश्यकता:

पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.
**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.

- शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर
- आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.
- एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.

इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:
कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.
संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९

# समृद्धीच्या कंत्राटदाराला पोलिसांसमोरच चोप!

## मनसेचे कारंजात 'खळ्ळ खट्याक'; निकृष्ट कामावरून संताप अनावर

**▸विदर्भ केसरी।**



अकोला : समृद्धी महामार्गावरील असुविधा व दर्जाहीन कामांच्या मुद्द्यावरून बैठकीत पोलिसांसमोरच कंत्राटदाराला शिवीगाळ देऊन चोप दिल्याची धक्कादायक घटना वाशीम जिल्ह्यातील कारंजा येथे घडली. संतप्त मनसेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कंत्राटदाराला मारहाण केली. यावेळी मोठा गोंधळ उडाला होता. पोलिसांनी मनसेच्या पदाधिकाऱ्यांची समजूत काढून परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. या राड्यामुळे चांगलीच खळबळ उडाली होती.

मुंबई ते नागपूर असा ७०१ किलोमीटरचा प्रवास अवघ्या आठ तासांत पार करण्याचे उद्दिष्टे ठेऊन समृद्धी महामार्ग तयार झाला. दहा जिल्ह्यांमधील ३९० गावांना हा महामार्ग जोडतो. अत्याधुनिक पद्धतीने समृद्धी द्रुतगती महामार्ग तयार केल्या गेला आहे. नियमित घडणाऱ्या अपघातांसह असुविधांमुळे हा महामार्ग कायम चर्चेत असतो. याच मुद्द्यावरून कारंजा येथे उद्रेक बघायला मिळाला.

प्रवाशांच्या असुविधांकडे होणारे दुर्लक्ष व अपघाताच्यावेळी आपत्कालीन सुविधेतील दिरंगाई आदी मुद्द्यांवरून कारंजा लाड येथे मनसे कार्यकर्त्यांनी जोरदार आंदोलन केले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष राजू पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी थेट कंत्राटदाराला चोप दिला. समृद्धी महामार्गावरील कामाची गुणवत्ता आणि प्रवाशांना मिळणाऱ्या सुख-सोयींबाबत स्थानिक नागरिक व प्रवाशांच्या अनेक तक्रारी होत्या.


या तक्रारींकडे कंत्राटदार आणि प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत आहे. याच संतापातून बैठकीतच मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी कारंजा लाड परिसरात कंत्राटदाराला गाठले. बैठकीतील चर्चेदरम्यान पोलिसांच्या उपस्थितीतच मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी कंत्राटदाराला मारहाण केली. यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता.

### '...तर मनसे स्टाईलने जाब विचारला जाईल'

- **नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासन दखल घेत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. पोलिसांच्या समोरच कंत्राटदाराला मारहाण झाल्याने समृद्धी महामार्गावरील सुरक्षेचा मुद्दा उपस्थित झाला. 'लोकांच्या जिवाशी खेळणाऱ्या निकृष्ट कामाची तक्रार करूनही दखल घेतली जात नसेल, तर मनसे स्टाईलने जाब विचारला जाईल,' असा इशारा मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. पोलिसांनी वेळीच परिस्थिती नियंत्रणात आणली. हलगर्जीपणा करणाऱ्या कंत्राटदारावर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे. या आंदोलनात राजू पाटील यांच्यासह अमोल लुलेकर (जिल्हाध्यक्ष, वाहतूक सेना), गजानन वैरागडे (जिल्हा सचिव), कपिल महाजन (शहराध्यक्ष, कारंजा), उमेश टोलमारे (उपजिल्हाध्यक्ष, वाशीम) आतिश डहाळे (उपजिल्हाध्यक्ष, मालेगाव-रिसोड) आदी पदाधिकारी सहभागी होते.**

## एसटीचा प्रवास महागला !

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**



एसटी बस, बसस्थानक, बसस्थानकाचा परिसर स्वच्छ ठेवण्याची महामंडळाची ऐपत नाही, असे अप्रत्यक्ष मान्य करत यासाठीच्या खर्चाचा भार प्रवाशांवरच टाकण्यात आला आहे.

प्रत्येक तिकिटामागे आता दोन रुपये वसूल केले जाणार आहेत. १५ एप्रिलच्या मध्यरात्रीपासून याची अंमलबजावणी केली जाणार आहे. महामंडळाच्या गंगाजळीत या मार्गाने दररोज एक कोटी दहा लाख रुपयांची भर पडणार आहे.स्वच्छतेच्या बाबतीत एसटीची कायम बोंबाबोंब राहिली आहे. धुळीने माखलेल्या सीट्स, पान-खर्राच्या पिचकाऱ्यांनी रंगलेले बस, बसस्थानकाचे कोपरे, खाद्यपदार्थांचे रिकामी पाकीटे हे चित्र सर्रास दिसते. शिवाय एसटी बस बाहेरूनही भरलेली असते. बसस्थानकाच्या परिसरात साचून असलेला कचरा, मुतारीची अनियमित स्वच्छता यामुळे दुर्गंधी पसरली असते.

वास्तविक ही कामे एसटीला मिळणाऱ्या उत्पन्नातून करणे गरजेचे असताना त्याचा भुर्दंड प्रवाशांवर टाकला जात आहे.

एसटीकडे सफाई कामगारांची वानवा असल्याने स्थानिक पातळीवर कंत्राटी पद्धतीने कर्मचाऱ्यांकडून स्वच्छता करून घेतली जाते. त्यांची सेवा अपेक्षेप्रमाणे दर्जेदार नाही, अशा तक्रारी असल्याचे कारण पुढे करत महामंडळाने स्वच्छता अधिभार लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

- **स्पेशल बसकरिता ५० रुपये**

प्रासंगीक कराराकरिता एसटी बस बुक करणाऱ्या व्यक्तीकडून अधिभाराच्या नावाखाली प्रतिबस ५० रुपये आकारले जाणार आहे. शिवाय, आवडेल तेथे प्रवास, पासधारक प्रवासी यांच्याकडून प्रत्येकी पाच रुपये घेण्यात येणार आहे. या माध्यमातून सातून एसटी महामंडळाने उत्पन्नाचा नवीन मार्ग शोधला असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. एसटी स्वच्छ राहावी म्हणून प्रवाशांवर भुर्दंड का, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

- **दररोज ५५ लाख प्रवाशांची वाहतूक**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून दररोज ५५ लाख नागरिक प्रवास करतात, असे एसटीकडून सांगितले जाते. एका प्रवाशाकडून दोन रुपये म्हणजे ५५ लाख प्रवाशांकडून एक कोटी दहा लाख रुपये वसूल होणार आहे. अधिभाराच्या या रकमेतून राज्यभरातील २५१ आगार आणि ५९८ बसस्थानके स्वच्छ ठेवले जाईल, असा दावा केला जात आहे.



दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
गुरुवार, ९ एप्रिल २०२६ | २

अग्रलेख

## कलगीतुरा

गेल्या काही वर्षांत राज्याच्या राजकारणात झपाट्याने बदल घडत आहेत. विचार बाजूला सारून स्वार्थ साधण्यासाठी युती आणि आघाड्यांचे राजकारण रात्रीतून उदयाला येताना आपण पाहत आहोत. सत्तेसाठी विचारधारांच्या भिंती ओलांडून कोलांटउड्या मारण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. 2019 मध्ये सुरू झालेला महाविकास आघाडीचा प्रयोगही त्याचेच उदाहरण. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) या भिन्न विचारसरणीच्या पक्षांनी तेव्हा एकत्र येऊन सत्ता स्थापन केली; मात्र या आघाडीच्या पायाभरणीतच मोठी विसंगती होती, हे सतत सिद्ध होत गेले आणि बारामती पोटनिवडणुकीच्या निमित्ताने तेच वास्तव पुन्हा एकवार अधोरेखित झाले आहे. बारामती म्हणजे पवार कुटुंबीयांचा बालेकिल्ला. शरद पवारांनी या मतदारसंघाला, शहराला राष्ट्रीय पातळीवर वेगळी ओळख दिली. त्यानंतर अजित पवारांनी ही परंपरा पुढे नेत बारामतीचा विकास साधला. अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या रिक्त जागेसाठी आता सुनेत्रा पवार मैदानात उतरल्या आहेत. त्यामुळे ही निवडणूक भावनिक, राजकीय आणि प्रतीकात्मक अशा तिन्ही पातळ्यांवर महत्त्वाची ठरणार आहे. अशा वेळी महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेनुसार, विशेषतः एखाद्या प्रभावी नेत्याच्या निधनानंतर होणारी पोटनिवडणूक ही बिनविरोध व्हावी, अशी अपेक्षा असते. सहानुभूतीची लाट लक्षात घेऊन विरोधक अनेकदा निवडणूक लढविणे टाळतात. मात्र बारामतीत असे घडले नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे महाविकास आघाडीतील अंतर्गत विसंवाद. एकीकडे महाविकास आघाडीचे जन्मदाते असलेले शरद पवार आणि उद्धव ठाकरे वेगळी भूमिका घेतात, तर दुसरीकडे काँग्रेस वेगळ्या दिशेने धावते. याचा अर्थ अतिशय स्पष्ट आहे आणि तो असा की, येणाऱ्या काळात हे तिन्ही पक्ष एकमेकांसोबत नसतील किंवा असलेच तर ते केवळ सत्तेचे गणित जुळवण्यासाठी असतील. काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार देत महाविकास आघाडीत वेगळी चूल मांडली. बारामतीत उमेदवार उभा करण्यामागे काँग्रेसची अनेक राजकीय गणिते असू शकतात. पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व टिकवणे, स्थानिक नेतृत्वाला संधी देणे किंवा आगामी निवडणुकांसाठी संघटन मजबूत करणे यातले काहीही असू शकते. मात्र, बारामतीत सुनेत्रा पवार यांच्या विरोधात काँग्रेसने उमेदवार दिल्यामुळे महाविकास आघाडीतील समन्वयाचा अभाव अधोरेखित झाला आहे हे मात्र खरे. खèया अर्थाने एकसंध महाविकास आघाडी अस्तित्वात असती, तर असा निर्णय एकमताने घेतला गेला असता. काँग्रेसचाच उमेदवार द्यायचा असे ठरले असते तर आघाडीतील अन्य घटक पक्षांनी त्याला पाठिंबा दिला असता. काँग्रेसच्या निर्णयाला रोखण्यात किंवा समन्वय साधण्यात या दोन्ही घटक पक्षांना म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि उद्धव सेनेला अपयश आले. त्यामुळे 'महाविकास आघाडी' ही केवळ नावापुरती राहिली आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होतो आहे. बारामती पोटनिवडणुकीत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी सुनेत्रा पवारांविरुद्ध उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला. या मुद्यावर महाविकास आघाडी एकसंध राहील, अशी अपेक्षा होती. कारण परंपरेनुसार ही जागा राष्ट्रवादीच्या वाट्याची मानली जाते. मात्र काँग्रेसने अचानक उमेदवार देत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. पहिला प्रश्न म्हणजे राष्ट्रवादीने कुठल्याही प्रकारचा संवाद न साधता बारामतीची जागा काँग्रेसला दिली कशी? आणि दुसरा प्रश्न म्हणजे, जर खरोखरच अजित पवारांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या वातावरणात शरद पवारांना ही निवडणूक बिनविरोध करायची होती, तर स्वतःची भूमिका काँग्रेसला समजावून सांगण्यात ते कमी पडले का? यातील तिसरा आणि महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, अजित पवारांबद्दल सहानुभूती असताना आणि आघाडीतील घटक पक्ष थेट सोबत नसताना काँग्रेस मैदानात कशासाठी उतरली? या प्रश्नांची उत्तरे येणारा काळ देईल. सध्या मिळालेले उत्तर एवढेच की, महाविकास आघाडीत एकवाक्यता नाही आणि आपसात समन्वय देखील नाही. बारामती पोटनिवडणूक अजून निकालापर्यंत पोहोचलेली नसली, तरी निवडणुकीआधीच महाविकास आघाडीची 'फजिती' सुरू झाली आहे. यात सर्वाधिक अडचण झाली आहे ती काँग्रेसची. बारामतीत काँग्रेसच्या संघटनाला पूर्वीपासूनच मर्यादा आहेत. त्यात आता महाविकास आघाडीतील घटक पक्ष सोबत नाहीत. त्यामुळे ही निवडणूक काँग्रेसची परीक्षा घेणारी ठरणार आहे. अजित पवारांच्या निधनामुळे सुनेत्रा पवारांबद्दल सहानुभूतीची लाट कायम असताना हा निर्णय घेण्यास काँग्रेसला कोणी बाध्य केले, हाही प्रश्न आहे. राजकारणात कोणत्याही कृतीचा कायम दूरगामी परिणाम होत असतो. तसाच बारामतीच्या या निर्णयाचाही होणार आहे. 2024 च्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला राज्यात चांगल्या जागा मिळाल्या होत्या. मात्र त्यानंतर अशाप्रकारचे विसंवाद वेळोवेळी समोर आल्याने लोकसभेचा प्रभाव त्यांना कायम ठेवता आला नाही. मतदारांचा विश्वास गमावल्यामुळे विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा फटका बसला. त्याचे प्रमुख कारण म्हणजे मतदारांना गृहीत धरून आकड्यांची गोळाबेरीज करणे. आजचा मतदार केवळ आघाडी पाहत नाही, तर त्या आघाडीचा हेतू आणि विचारही पाहतो. कोणत्याही राजकीय पक्षाची खरी शिदोरी त्यांचा दीर्घकालीन विचार आणि विश्वास हीच असते. या शिदोरीशीच खेळण्याचे काम महाविकास आघाडीकडून घडले आहे. काँग्रेसने निवडणूक लढवण्यात काहीही गैर नाही; पण महाविकास आघाडी म्हणून राज्यसभेला एकत्र निर्णय घ्यायचे आणि त्यानंतरच्या पोटनिवडणुकीत स्वतंत्र भूमिका घेत मैदानात उतरायचे, हा दुटप्पीपणा आहे.

# महावितरण अभियंत्याला लाच घेताना अटक

## चार हजार रुपयांची लाच स्विकारतांना कारवाई

**विदर्भ केसरी। धारणी,**

**एका ग्राहकाकडून बुधवारी दुपारी चार हजार रुपयांची लाच स्विकारताना महावितरण उपविभाग, धारणीचा अभियंता सुशांत बावनगडे यांना रंगेहाथ पकडण्यात आले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली.**





केंद्र सरकार व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या सौर उर्जा अभियानात भाग घेणाऱ्यांना ४ ते ८ हजारापर्यंतची मागणी बावनगडे नेहमी कराचे म्हणून एका ग्राहकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावतीला संपर्क करुन या भ्रष्टाचारी सुशांतचा पंचनामा करुन टाकला. ८ एप्रिलच्या दुपारी महावितरण धारणीच्या कार्यालयातच ४ हजाराची लाच घेताना पथकाने पकडून कारवाई यशस्वी केल्याने मेळघाटात भ्रष्टाचार किती वाढला आहे हे समोर आले आहे.

देशात विजेचा तुटवडा आणि उपयोगाचे महत्व लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सौर उर्जेवर आधारित योजनांसाठी अनुदान सुरू करुन नागरिकांना प्रोत्साहित केले. मात्र, भ्रष्ट अधिकारी ही योजना मंजुरीसाठी ४ ते ८ हजाराची लाच मागून शासनाच्या योजनेला छेद देत आहेत. धारणी येथील जवळपास प्रत्येक शासकीय कार्यालयात भ्रष्ट कर्मचाऱ्यांची उपस्थिती असल्याने अनुदानित योजना असो की डीबीटी लाच घेणे-देणे असा नियमच झालेला आहे, हे विशेष!

अमरावती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पो. नि. योगीता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात आजची यशस्वी कारवाई करण्यात आल्याने मेळघाटात आनंदाची लाट पसरलेली आहे. बातमी लिहेपर्यंत कारवाई सुरू होती. या कारवाईमुळे सौर उर्जेच्या लाभार्थी ग्राहक आता अनुभव सांगत असल्याने अनेक प्रकरणे बाहेर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# ४० हजारांची लाच घेताना वैद्यकीय अधीक्षकाला अटक

**विदर्भ केसरी। परभणी :**

जिल्ह्यातील पालम येथील ग्रामीण रुग्णालयातील स्वच्छता सेवा टेंडर मंजूर करण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या वैद्यकीय अधीक्षकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी (दि. ८) रंगेहाथ पकडले. तडजोडीनंतर ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना ही कारवाई करण्यात आली असून, जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. डॉ.रमेश दगडोबा खंदारे, वैद्यकीय अधिकारी (वर्ग अ), जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी तसेच अतिरिक्त पदभार वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, पालम असे लाच घेताना पकडलेल्या अधिकाऱ्यांचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परभणी येथील एका ३२ वर्षीय तक्रारदाराच्या भावाच्या नावाने परिवर्तन लेबर कॉन्ट्रॅक्टर अँड मल्टी सर्विस ही फर्म कार्यरत आहे. या फर्ममार्फत दि. २७ मार्च रोजी ग्रामीण रुग्णालय, पालम येथे स्वच्छता सेवेसाठी कोटेशन बेसवर टेंडर भरले होते. सदर टेंडर मंजूर करण्यासाठी संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ५० हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार दि.२ एप्रिल रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती. तक्रारीची पडताळणी करताना पंचासमक्ष वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तडजोडीअंती ४० हजार रुपये लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. तसेच टेंडर मंजुरीचा आदेश देऊन लाच रक्कम तात्काळ आणण्यास सांगितले. यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी (दि.८) ग्रामीण रुग्णालय, पालम परिसरात सापळा रचला. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.खंदारे यांनी तक्रारदाराकडून ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताच पथकाने त्यांना रंगेहाथ पकडले. कारवाई दरम्यान आरोपीच्या अंगझडतीत २,१२० रुपये रोख रक्कम, सॅमसंग कंपनीचा मोबाईल हँडसेट तसेच त्यांच्या चारचाकी वाहनातून १५ हजार रुपये रोख रक्कम आढळून आली. मोबाईल जप्त करण्याबाबत तपास सुरू असून आरोपीच्या घराची झडती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या प्रकरणी पालम पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर अटक करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र व परभणी यांच्या संयुक्त पथकाने केली.

या पथकाचे नेतृत्व पोलीस निरीक्षक बाबासाहेब थोरे यांनी केले असून पोलीस उप अधीक्षक महेश पाटणकर यांनी पर्यवेक्षण केले. पुढील तपासही त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील भ्रष्टाचाराविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुन्हा एकदा कडक संदेश दिला आहे.

# लाच घेताना 'भूमी अभिलेख'चा कर्मचारी रंगेहात जेरबंद

**विदर्भ केसरी। परभणी :**

पाथरी तालुक्यात लाचखोरीविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी अत्यंत नियोजनबद्ध आणि धडक कारवाई करत भूमी अभिलेख कार्यालयातील एका नीमतानदाराला रंगेहात पकडले. या कारवाईमुळे प्रशासनात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वडी (ता. पाथरी) येथील ६३ वर्षीय तक्रारदार यांच्या पुतण्याची शेती जमीन ढालेगाव बंधाऱ्याच्या बॅकवॉटरमध्ये गेल्याने पुनर्वसनासाठी भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणी करण्यात आली होती. मात्र संबंधित जमिनीची मोजणी कमी झाल्याचा आरोप करत पुनर्मोजणीसाठी अर्ज करण्यात आला होता. या कामासाठी पाठपुरावा सुरू असताना संबंधित कार्यालयातील नीमतानदार रामेश्वर गुरुलिंगप्पा बिडकर याने तक्रारदाराकडे तब्बल १५ हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली.तक्रारीची गंभीर दखल घेत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तत्काळ पडताळणी केली. फोनवरील संभाषणातून आरोपीने लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. पुढील दिवशी पुन्हा पडताळणी करताना पंचासमक्ष आरोपीने तडजोडीअंती १२ हजार रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. यानंतर बुधवारी (दि.८) सकाळी सापळा रचण्यात आला. पाथरी येथील साई मंदिर रोडवरील राऊत यांच्या कटिंग दुकानासमोर आरोपीने तक्रारदाराकडून ८ हजार रुपयांची लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वीकारताच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्याला रंगेहात जेरबंद केले. कारवाईनंतर आरोपीची अंगझडती घेण्यात आली असून त्याच्याकडील मोबाईलची तपासणी सुरू आहे. तसेच आरोपीच्या घराची झडती घेण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या प्रकरणी पाथरी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस उपअधीक्षक महेश पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून पोलीस निरीक्षक अल्ताफ मुलाणी हे तपास करीत आहेत. दरम्यान, या धडक कारवाईमुळे शासकीय कार्यालयांमधील लाचखोरीवर आळा बसण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत असून नागरिकांनी अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये पुढे येऊन तक्रार करण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आले आहे.

# बीड एसीबीचा लाचखोरांना 'डबल' झटका; तलाठी अन् ग्रामसेवक जाळ्यात!

**विदर्भ केसरी। बीड:**

जिल्ह्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी एकाच दिवशी दोन धडाकेबाज कारवाया करून भ्रष्ट महसूल आणि ग्रामविकास प्रशासनाला मोठा धक्का दिला आहे. केज तालुक्यात एका तलाठ्याला ९ हजार रुपये, तर परळी तालुक्यात एका ग्रामसेवकाला ५०० रुपयांची लाच घेताना रंगेहाथ अटक करण्यात आली.




**पहिली कारवाई: केज तालुक्यात माजी सैनिक असलेला तलाठी जाळ्यात**

केज तालुक्यातील दहिफळ (वडमाऊली) येथील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) परमेश्वर अभिमान जाधव (वय ४७) याला ९ हजार रुपयांची लाच घेताना पकडण्यात आले. तक्रारदाराच्या वारसाप्रमाणे सातबाऱ्यावर नोंदी करण्यासाठी जाधव याने ३५ हजार रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी ९ हजार रुपये कामाच्या अगोदर आणि उर्वरित पैसे काम झाल्यावर देण्याचे ठरले होते. विशेष म्हणजे, परमेश्वर जाधव हा माजी सैनिक असून निवृत्तीनंतर सहा महिन्यांपूर्वीच तलाठी म्हणून सेवेत रुजू झाला होता. नवीन नोकरीत अवघ्या सहा महिन्यातच तो एसीबीच्या जाळ्यात अडकला. ही कारवाई एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांच्या पथकाने गावात जाऊन केली.

**दुसरी कारवाई: परळीत विहीर बिलाच्या सहीसाठी ग्रामसेवक जेरबंद**

परळी तालुक्यातील जिरेवाडी येथील ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) दशरथ देविदासराव गोरे याला ५०० रुपयांची लाच स्वीकारताना पकडण्यात आले. जलसिंचन विहिरीच्या कुशल बांधकामाचे बिल काढण्यासाठी त्याने एक हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. लाचेची मागणी पंचायत समिती कार्यालय परिसरात करण्यात आली होती, मात्र त्यानंतर आपल्या खासगी कार्यालयात ५०० रुपये स्वीकारताना पोलीस निरीक्षक कवडे आणि त्यांच्या पथकाने गोरेला रंगेहाथ पकडले.




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

GOOD MORNING
# कॉटनसिटी



!! मन-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## तिसऱ्या दिवशीही अतिक्रमण हटाव मोहीम जोरात

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

नगर परिषदेच्यावतीने सुरु असलेल्या अतिक्रमण हटाव मोहीमेने तिसऱ्या दिवशी बुधवारी (ता.८) वेग पकडला आहे. बसस्थानक ते दारव्हा मार्गावरील मारुती सुझूकी शोरुमपर्यंत आतापर्यंत अतिक्रमीत शेकडो दुकाने हटविण्यात आली आहे. तर बुधवारी या परिसरातील २० ते २५ दुकानासमोरील अतिक्रमण काढण्यात आले आहे. दरम्यान, काही घरासमोरील अतिक्रमण कमान, वॉलकपाउंडवरही नगर पालिकेने हातोडा चालविला आहे. नगर पालिकेच्या कारवाईत पालिकेतील विविध विभागातील कर्मचाऱ्यांसह, बांधकाम विभाग, पोलिस कर्मचाऱ्यांचाही समावेश होता.

**महत्त्वाचे**

## "विदर्भातून मोठी बातमी! सतीश भालेराव महाराष्ट्र ब्युरो चीफ

**▸विदर्भ केसरी। विशेष प्रतिनिधी नागपूर :-**



नागपूर जिल्ह्यातील वानाडोंगरी येथील रहिवासी सतीश भालेराव यांची दिल्ली येथील नॅशनल डिजिटल न्यूज चैनल भारतवर्ष डिजिटल न्यूजच्या महाराष्ट्र ब्युरो चीफपदी निवड करण्यात आल्याने संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अभ्यासपूर्ण दृष्टिकोन, सामाजिक जाणीव आणि निर्भीड व धाडसी पत्रकारिता यासाठी ओळख असलेल्या भालेराव यांच्या निवडीमुळे विदर्भातील डिजिटल पत्रकारितेला नवी दिशा मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. मागील तब्बल पंधरा वर्षांपासून पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या भालेराव यांनी क्राईम आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विशेष म्हणजे ते क्रीडा शिक्षक असून पत्रकारिता हा त्यांचा जिव्हाळ्याचा छंद आहे. RTI ॲक्टिविस्ट म्हणूनही त्यांनी अनेक मोठे भ्रष्टाचार उघडकीस आणत संबंधित अधिकाऱ्यांना कोर्ट व जेलची पायरी दाखवली आहे. त्यांच्या धाडसी कामगिरीमुळे समाजात पारदर्शकतेचा संदेश पोहोचला आहे. सतीश भालेराव यांच्या कामाची खास शैली म्हणजे "इन्वेस्टीगेटिव्ह जर्नलिझम" थेट घटनास्थळी जाऊन, अनेकदा रात्री उशिरापर्यंत स्वतःच्या बळावर क्राईम बातम्यांचे कव्हरेज करणे. "रेड" करने या शैलीतील त्यांची पत्रकारिता आणि RTI च्या माध्यमातून भ्रष्टाचाराविरोधातील लढा (Fight for Curruption) यामुळे त्यांना वेगळी ओळख मिळाली आहे. त्यांच्या या कार्याला सर्व स्तरातून मानाचा मुजरा केला जात असून, समाजहितासाठी केलेल्या योगदानाचे कौतुक होत आहे. या निवडीची बातमी समोर येताच हिंगणा तालुका, नागपूर तसेच इतर जिल्ह्यांमधून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. विविध सामाजिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, सतीश भालेराव यांनी आपल्या नियुक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करत निष्पक्ष, धाडसी आणि समाजहिताची पत्रकारिता करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. "सत्य आणि जनतेचा आवाज" हेच ध्येय ठेवून कार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या या नव्या जबाबदारीकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले असून, भविष्यात ते पत्रकारिता आणि शिक्षण क्षेत्रात आणखी उच्च शिखर गाठतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## सेवाग्राम येथे ४ दिवसीय सर्वोदय शिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

**▸विदर्भ केसरी। सेवाग्राम वर्धा राजहंस शेंडे**



येथील सर्व सेवा संघ कार्यालयात ५ ते ८ एप्रिल २०२६ दरम्यान आयोजित चार दिवसीय सर्वोदय शिक्षण शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाले. देशातील १३ राज्यांमधून आलेल्या तब्बल ११० युवक-युवतींनी या शिबिरात सक्रिय सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकीचा नवा आदर्श निर्माण केला.

या शिबिरात सर्वोदय विचार, विश्व मानवता, भारतीयता, संविधान, संवैधानिक मूल्ये आणि सांस्कृतिक हस्तक्षेप या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. सर्व सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष चंदन पाल, ज्येष्ठ गांधीवादी अरविंद अंजुम, हुसैन शेख, रामधीरज, नंदलाल मास्टर, अविनाश काकडे, विभा गुप्ता आणि बजरंग भाऊ यांनी विविध सत्रांमधून युवकांना विचारप्रवृत्त केले. उद्घाटन सत्रात चंदन पाल यांनी "सत्याग्रह, सर्वोदय आणि स्वराज्य या विचारांची आजच्या काळात नव्याने मांडणी करण्याची गरज आहे," असे सांगत संवादाच्या माध्यमातून परिवर्तन घडविण्याचा संदेश दिला. अविनाश काकडे यांनी भारतीय संविधान, बहुलतावाद, संघीय व्यवस्था आणि विकेंद्रित अर्थव्यवस्थेवर सखोल विवेचन केले. दुसऱ्या दिवशी "युद्ध नको, शांती हवी" या संदेशाने प्रेरित सर्वधर्म प्रार्थना घेण्यात आली. अरविंद अंजुम यांनी युद्धाचे दुष्परिणाम स्पष्ट करत शांततेचे महत्त्व अधोरेखित केले, तर बजरंग भाऊ यांनी सामाजिक व राजकीय वास्तवावर भाष्य केले. तिसऱ्या दिवशी भारतीय संविधान आणि नैतिक मूल्यांवर सखोल चर्चा झाली. सहभागी युवकांनी विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीपासून, ज्योतिबा फुले यांच्या स्त्री शिक्षण चळवळीपर्यंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी विचारांपासून ते महात्मा गांधी यांच्या अहिंसात्मक समाजरचनेपर्यंतच्या विचारांचा अंगीकार करण्याचा संकल्प केला. शिबिरादरम्यान सामूहिक खेळ, परिवर्तन गीत, सर्वधर्म व निसर्ग प्रार्थना, श्रमदान, स्वच्छता अभियान, गटचर्चा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून युवकांमध्ये संघभावना, नेतृत्वगुण आणि सामाजिक जाणीव वृद्धिंगत करण्यात आली. शिबिराचे प्रभावी संचालन भूपेश भूषण यांनी केले. आयोजन यशस्वी करण्यासाठी विविध राज्यांतील कार्यकर्त्यांनी मोठे योगदान दिले. या शिबिरातून युवकांना समाजपरिवर्तनासाठी आवश्यक विचार, मूल्ये आणि कृतीची दिशा मिळाल्याचे समाधान आयोजकांनी व्यक्त केले.

# 500 कोटीचे अवैध गौण खनिज उत्खनन

## तक्रार खोटी निघाल्यास फौजदारी कारवाई करा – अमोल कोमावार यांचे सरकारला आवाहन

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



वर्धा–यवतमाळ–नांदेड या बहुचर्चित रेल्वे प्रकल्पात अवैध गौण खनिज उत्खननाचा मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या ईटीएस मोजणीमध्ये धक्कादायक बाबी समोर येत आहेत. कळंब तालुक्यात सुमारे 23 कोटी रुपये तर यवतमाळ तालुक्यात तब्बल 62 कोटी रुपयांचे अवैध उत्खनन झाल्याचे ईटीएस मोजणी अहवालात स्पष्ट झाले आहे. ही मोजणी केवळ रेल्वे ट्रॅकपुरती मर्यादित असून ट्रॅकच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणात डोंगर पोखरून गौण खनिज काढण्यात आले आहे. कळंब आणि यवतमाळ या दोनच तालुक्यात रेल्वे ट्रॅक परिसरातील उत्खननाची किंमत जवळपास 500 कोटी असल्याचा दावा करीत ईटीएस मोजणी करा, आणि यापेक्षा कमी गौण खनीज निघाल्यास माझ्यावर फौजदारी दाखल करा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अमोल कोमावार यांनी सरकारला केले आहे.

यवतमाळ तालुक्यातील मौजे कारली ते गोधनी या सुमारे 17 किलोमीटर पट्ट्यात 8 लाख 90 हजार 506 ब्रास गौण खनिज उत्खनन झाल्याचे समोर आले आहे. शासनाच्या दरानुसार याची किंमत 62 कोटी 33 लाख रुपयांपेक्षा अधिक होते. अजुन 16 किलोमिटरची ईटीएस मोजणी बाकी आहे. दिलेला अहवाल सुध्दा अंदाजे असल्याने प्रत्यक्ष उत्खनन यापेक्षा अधिक असल्याचा आरोप अमोल कोमावार यांनी केला आहे. कळंब तालुक्यातील घोटी-चापर्डा भागात 23 कोटींचे उत्खनन समोर आले असून, उमरखेड तालुक्यातही मोठ्या प्रमाणात उत्खनन झाल्याचे समोर आले आहे. रेल्वे प्रकल्पात अवैध गौण खनीज उत्खनन होत असल्याच्या तक्रारी 27 ऑगस्ट 2020 पासून सातत्याने तहसीलदार ते जिल्हाधिकारी स्तरापर्यंत करण्यात आल्या. मात्र, कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. आता मात्र कोटयवधी रुपयांचे उत्खनन झाल्याचे समोर आल्याने या घोटाळ्याकडे दुर्लक्ष करणा-या तसेच शासनाची कोट्यवधी रुपयांची रॉयल्टी बुडविण्यास सहकार्य करणा-या अधिका-यांना निलंबित करण्याची मागणी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचेकडे केली आहे.

### रॉयल्टी बुडविण्यास अधिकारी जबाबदार

**■ या घोटाळ्याला तहसिलदार तसेच जिल्हा खनीकर्म अधिकारी हे सर्वाधिक जबाबदार आहे. सातत्याने तक्रारी केल्यानंतर सुध्दा तत्कालीन तसेच विद्यमान तहसिलदार, जिल्हा खनीकर्म अधिकारी यांनी तक्रारीकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ईटीएस मोजणी करण्याची क्षमता असतांना खनीकर्म अधिका-यांनी साहित्य तसेच मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले नाही. शासनाच्या अहवालात उत्खननाच्या ठिकाणी मूळ जमीन पातळी (ओजीएल) उपलब्ध नसणे, तांत्रिक यंत्रणा अपुरी असणे यामुळे सरासरी मोजमापावर अहवाल तयार केल्याचे म्हटले आहे. वास्तविक हा ट्रॅक मधील घोटाळा सुध्दा मोठा असून सरकारने तंत्रज्ञानाचा वापर करुन पुन्हा मोजावा तसेच ट्रॅक परिसरातील जवळपास पाचशे कोटीचे उत्खनन फक्त कळंब आणि यवतमाळ तालुक्यात झालेले असल्यामुळे ईटीएस मोजणी करण्याची मागणी अमोल कोमावार यांनी केली आहे.**

## मूर्तिजापूरात 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत कारवाई

**गोवंश तस्करी व मांस विक्री करणाऱ्या दोघांवर गुन्हे दाखल.**

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार, अवैध धंद्यांविरुद्ध राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत मूर्तिजापूर शहर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. जुनी वस्ती भागातील मोहम्मदिया प्लॉट परिसरात गोवंशाची कत्तल आणि मांस विक्री करणाऱ्या दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मूर्तीजापूर शहर पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, जुनी वस्ती भागातील मोहम्मदिया प्लॉट येथे गोवंश जातीच्या कालवडीला कत्तल करण्याच्या उद्देशाने निर्दयतेने बांधून ठेवले होते. या माहितीवरून पोलिसांनी पंचासह धाड टाकली असता, एक पांढऱ्या रंगाची सुमारे १५ हजार रुपये किमतीची कालवड आढळून आली. सदर गोवंश श्री पुंडलिक महाराज गोरक्षण संस्था येथे जमा करण्यात आला आहे.

तसेच, दुसऱ्या एका कारवाईत मोहम्मदिया प्लॉट परिसरातील मोकळ्या जागेत गोमांसाची विक्री केली जात असताना पोलिसांनी छापा टाकला. यावेळी घटनास्थळावरून सुमारे ८५ किलो गोवंश मांस, इलेक्ट्रॉनिक वजन काटा आणि मांस कापण्याचे साहित्य असा एकूण १७,२५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**■ आरोपींची नावे**

या प्रकरणी पोलिसांनी खालील दोन आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. १) शेख इब्राहिम शेख जब्बार*वय ३८ वर्षे, रा. मोहम्मदिया प्लॉट, मूर्तीजापूर २) मोहम्मद दानिश मोहम्मद इक्बाल वय २४ वर्षे, रा. मोहम्मदिया प्लॉट, मूर्तीजापूर)व, पोलीस पथक व सदर कारवाई अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली मूर्तीजापूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित जाधव, पोलीस उपनिरीक्षक गणेश सूर्यवंशी व त्यांच्या पथकाने केली. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ (सुधारणा २०१५) च्या कलम ५, ९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश सूर्यवंशी करत आहेत.

## पोलीसांवर पोलीस कर्मचाऱ्याचा हल्ला

**▸विदर्भ केसरी। संग्रामपूर।**

तालुक्यातील कवठळ शेत शिवारात ५ एप्रिलच्या रात्री गस्तीदरम्यान पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणातील एक आरोपी स्वतः पोलीस कर्मचारी असल्याने घटनेची दखल घेतली जात आहे. याप्रकरणी तामगाव पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तामगाव पोलीस स्टेशनचे पोलीस हेडकॉन्स्टेबल संतोष तुळशीराम आखरे (वय ५१) यांच्या फिर्यादीवरून राजेश गव्हाळे (वय अंदाजे ४२) व मनोज गव्हाळे (वय अंदाजे ३८, पोलीस कर्मचारी, पोलीस स्टेशन उरळ, जि.अकोला) रा.कवठळ ता.संग्रामपूर जि.बुलढाणा यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी संतोष आखरे व सहकारी प्रमोद मुळे हे शासकीय वाहनाने रात्री गस्त घालत होते. दरम्यान, कवठळ शिवारात गुप्तधन काढत असल्याची माहिती मिळाल्याने त्यांनी तेथे जाऊन पाहणी केली; मात्र कोणताही संशयास्पद प्रकार आढळला नाही. परत येत असताना रस्त्यात आरोपी दोघे आढळले. त्यांना विचारणा केली असता त्यांनी शिवीगाळ करून मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. आरोपींनी स्टीलच्या कड्याने फिर्यादीच्या पाठीवर व कपाळावर मारहाण करून जखमी केल्याचा तसेच साक्षीदारालाही मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा उल्लेख फिर्यादीत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास तामगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार पंडितराव सोनवणे करीत आहेत.

## कष्टकरी तरुणाची आत्महत्या

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा :**

काबाड कष्टातून संपूर्ण कुटुंबाला आधार देणारा एक तरुण गेल्या कित्येक वर्षांपासून स्वतःच्या लग्नासाठी धडपडत होता. पण खोट्या प्रतिष्ठेच्या मागे धावणाऱ्या या काळात त्याचे लग्न जुळतच नव्हते. शेवटी निराश मनाने या तरुणाने गळफास लावून आपली जीवनयात्राच संपवून टाकली.समाजातील विदारक वास्तव चव्हाट्यावर आणणारी ही घटना पांढरकवडा शहरातील चंद्रशेखर वार्ड परिसरात घडली.

सिद्धार्थ मधुकर जंगलवार (३२) असे या मृत तरुणाचे नाव आहे. ही घटना ७ एप्रिल रोजी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. सिद्धार्थ गेल्या बारा वर्षांपासून पांढरकवडा नगरपरिषदेत कचरा गाडी चालक म्हणून कंत्राटी कार्यरत होता. लग्न न झाल्यामुळे तो मानसिक तणावात असल्याचे सांगण्यात आले आहे. घटनेच्या दिवशी तो कुटुंबासोबत जेवण करून घरी आला होता. काही वेळानंतर घरात एकटाच असताना त्याने बेडरूममधील स्लॅबच्या हुकाला दोरी बांधून गळफास घेतल्याचे आढळले.

शेजाऱ्यांच्या मदतीने त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले. याबाबत मृताची आई अनिता मधुकर जंगलवार यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## जिजाऊ–सावित्री संवादाने 'समता पर्व 'ची भव्य सुरुवात

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समता पर्व प्रतिष्ठान, यवतमाळ यांच्या वतीने आयोजित समता पर्व 2026 ची भव्य सुरुवात मंगळवार, दिनांक 7 एप्रिल रोजी सायंकाळी 7 वाजता उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. या पर्वाचा शुभारंभ 'जिजाऊ संवाद' व 'सावित्री संवाद' या प्रभावी सादरीकरणांनी झाला.


कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समता पर्वाचे अध्यक्ष नारायण थूल होते. यावेळी मार्गदर्शक प्रवक्ता उमेश मेश्राम, डॉ. चंद्रकांत सरदार, जनार्दन मनवर, डॉ.विलास कनाके, वनमाला वंजारी,, चंद्रकांत वाळके, प्रा. विजय डोंगरे, मृणालिनी दहिकर, कवडू नगराळे, दीपक नगराळे तसेच प्रसिद्ध संगीतकार डॉ. मधुकर मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत आराध्या लोहकरे हिने साकारलेल्या प्रभावी संवादाने झाली. तिच्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली. त्यानंतर धैर्या देशपांडे हिने 'जिजाऊ संवाद' सादर करत छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाऊंच्या विचारांचा प्रभावी संदेश दिला. कार्यक्रमात दोन चिमुकल्यांनी महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून वातावरण भावूक केले. यावेळी डॉ. मधुकर मेश्राम यांचा सन्मानही करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पल्लवी कांबळे, रीना वानखडे, हर्षाली बोडके, स्नेहा डोंगरे, ॲड. वैशाली हिरे, बीना नागदिवे, शुभांगी मालखेडे, ज्योती जीवने आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन राहुल कोचे यांनी केले, तर आभार प्रदर्शन पल्लवी रामटेके यांनी मानले. समता, बंधुता व सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणाऱ्या या पर्वाची सुरुवात उत्साहात झाली असून पुढील दिवसांत विविध सांस्कृतिक, शैक्षणिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांची मेजवानी यवतमाळकरांना मिळणार आहे.

## पण लग्नाआधीच पोहचले 'बाल रक्षक'

**पाचही बालके शिक्षणापासून वंचित असल्याची धक्कादायक माहिती समोर.**

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



जिल्ह्यात बालविवाहाची कुप्रथा मुळापासून उखडून टाकण्यासाठी प्रशासन आणि सामाजिक संस्थांनी कंबर कसली आहे. बार्शीटाकळी आणि अकोला तालुक्यातील एकाच दिवशी होणारे पाच बालविवाह जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड लाईन आणि 'ॲसेस टू जस्टीस' या संस्थेच्या धाडसी कारवाईमुळे रोखण्यात यश आले आहे. या कारवाईमुळे केवळ लग्नच थांबले नाही, तर पाच बालकांचे अंधकारमय होणारे भविष्य सुरक्षित झाले आहे. बार्शीटाकळी तालुक्यातील एकाच घरातील दोन बहिणी आणि दोन भाऊ, तसेच अकोला तालुक्यातील एका गावातील एक मुलगी अशा एकूण पाच अल्पवयीन मुला-मुलींचे विवाह एकाच दिवशी लावण्याचे नियोजन करण्यात आले होते. 'ॲसेस टू जस्टीस' आय.एस.डब्ल्यू.एस. या संस्थेला या विवाहांची गोपनीय माहिती मिळाली. माहिती मिळताच जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाचे सुनील सरकटे, चाईल्ड लाईन समन्वयक हर्षाली गजभिये आणि जिल्हा समन्वयक शंकर वाघमारे यांनी तातडीने घटनास्थळ गाठले.४०० वऱ्हाडी अन् बँड-बाजा; विधीपूर्वीच पथकाची धडक** पथक जेव्हा घटनास्थळी पोहोचले, तेव्हा लग्नाची जय्यत तयारी झाली होती. जवळपास ४०० हून अधिक वऱ्हाडी जमले होते, बँड पथक सज्ज होते आणि विवाहाचे विधी सुरू होणारच होते. मात्र, पथकाने वेळीच हस्तक्षेप करून हा विवाह सोहळा रोखला. वधू-वराकडच्या नातेवाईकांना आणि पालकांना ताब्यात घेऊन ग्रामपंचायत कार्यालयात आणण्यात आले.वयाचा 'खेळ' आणि कायद्याचा बडगा** तपासणीअंती यातील एक मुलगी १६ वर्षांची, दोन मुली १७ वर्षांच्या, तर एक मुलगा १८ आणि दुसरा १९ वर्षांचा असल्याचे निष्पन्न झाले. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार, मुलीचे वय १८ आणि मुलाचे वय २१ पूर्ण असणे अनिवार्य आहे. पथकाने पालकांना कायद्याचे गांभीर्य समजावून सांगितले आणि अल्पवयात लग्न केल्यामुळे मुलींच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे घातक परिणाम स्पष्ट केले.

**■ शिक्षणापासून वंचित असल्याची 'गंभीर' बाब***

या कारवाई दरम्यान एक विदारक वास्तव समोर आले. या पाच बालकांपैकी दोन मुली कधीच शाळेत गेल्या नव्हत्या, तर उर्वरित तिघांनी अर्ध्यावरच शाळा सोडली होती. ही मुले केवळ शाळेच्या पटावर हजर होती, मात्र पालकांसोबत स्थलांतरित होत असल्याने शिक्षणापासून पूर्णपणे वंचित राहिली होती.बाल कल्याण समितीचा कडक इशारा. हे प्रकरण अकोला येथील बाल कल्याण समितीसमोर मांडण्यात आले. समितीच्या अध्यक्षा ॲड. अनिता गुरव व सदस्यांनी पालकांना कडक शब्दांत फटकारले.

मुलीचे वय १८ व मुलाचे वय २१ पूर्ण झाल्याशिवाय लग्न करणार नाही," असे कायदेशीर हमीपत्र पालकांकडून लिहून घेण्यात आले.

**■ मुलीला तात्काळ शाळेत दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले.**

या प्रक्रियेत सरपंच, अंगणवाडी सेविका आणि आशा वर्कर यांना साक्षीदार म्हणून घेण्यात आले. बालविवाह हा केवळ सामाजिक कलंक नसून तो कायदेशीर गुन्हा आहे. बालविवाह लावून देणाऱ्यांना किंवा त्यात सहभागी होणाऱ्यांना दोन वर्षांचा तुरुंगवास आणि एक लाख रुपये दंड होऊ शकतो. जिल्हा प्रशासन, अकोला. यांनी बजावली मोलाची भूमिका बजावली आहे ही यशस्वी कारवाई बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा ॲड. अनिता गुरव, सदस्य राजेश देशमुख, डॉ. विनय दांदळे, ॲड. शिला तोषनिवाल, प्रांजली जयस्वाल, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू लाडुलकर, सुनील सरकते, हर्षाली गजभिये आणि शंकर वाघमारे यांच्या सतर्कतेमुळे पार पडली. मदत हवी असल्यास संपर्क करा बालविवाहाची माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाते. नागरिक खालील क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

## साक्षी बुरकुलेचा सत्कार



**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

पुसद: पुसदच्या इतिहासात गोल्ड मेडल मिळवून मानाचे स्थान मिळविणारी साक्षी सर्वसामान्य परिस्थिती असताना सुद्धा जिद्दीने व मेहनतीने तिन्हे यश मिळविले केंद्र सरकारतर्फे आयोजित रायपूर (छत्तीसगड) येथे पार पडलेल्या पहिल्या ट्रायबल खेलो इंडिया स्पर्धेत ८२ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकवणारी विदयार्थीनी कु.साक्षी बंडू बुरकुले हिचा माणुसकीची भिंत मदत केंद्र उपजिल्हा रुणालय पुसद येथे माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन पुसद ,मिशन ग्रीन,वसुंधरा बहुउद्देशीय संस्था यांच्याकडून सन्मानचिन्हे व वृक्ष रोपटे देऊन सत्कार करण्यात आला .तसेच उपस्थित मान्यवर शरद पाटील व अनिकेत पाटील यांच्या हस्ते खेलो इंडिया 2025 मध्ये कास्य पदक प्राप्त कु. पूजा संजय ढेपेकर व राज्यस्तरीय रोप्य पदक प्राप्त पियुष आढावे यांचा सुद्धा सन्मानचिन्हे व वृक्ष रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. साक्षी बुरकुले हिचा अभिमान पुसदवासीयांना आहे. तिने पुसद शहराचे नाव रोशन केले तिच्या या विजयाचे पुसद शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.यावेळेस शरद शेषराव पाटील,राजेश्वर पाटील,अनिल पाटील,अनिकेत पाटील,श्याम पाटील माणुसकीच्या भिंतीचे अध्यक्ष गजानन जाधव, मिशन ग्रीन चे अध्यक्ष रमेश डबोळे, मंगेश भगत,संतोष गावंडे मधुकर चव्हाण,दिगंबर देशमुख,सोनू पाटील,अरुण नागुलकर ,धनंजय आघाम,मुरलीधर ढगे,प्रमोद ठाकूर,दादाराव पाईकराव,दीपक घाडगे,आदित्य जाधव,अमित हटवार,नितीन चव्हाण व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चोरट्यांनी दोन महिलांचे मंगळसुत्र उडविले

■ यवतमाळ शिवमहापुराण कथेच्या मंडपातून गर्दीचा फायदा घेत चोरट्याने दोन महिलांचे मंगळसूत्र उडविले. ही घटना आर्णी येथील शिवमहापुरण कथेदरम्यान ३० मार्च रोजी घडली. तर या चोरीची तक्रार ७ एप्रिल रोजी पोलिस ठाण्यात नोंदवून घेण्यात आली. अंजुषा संजय पत्तेवार (५३) रा. गुरुदेवनगर ता. दिग्रस असे या चोरीची फिर्याद देणाऱ्या महिलेचे नाव आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, आर्णी येथे गेल्या आठवडाभरापासून पं. प्रदीप मिश्रा यांच्या शिवमहापुरण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. लाखो भाविक ही कथा ऐकण्यासाठी येत आहे. त्यात सर्वाधिक महिलांचा भरणा आहे. याच गर्दीत काही चोरटे मात्र संधी शोधत आहे. अशातच ३० मार्च रोजी दिग्रस तालुक्यातून अंजुषा पत्तेवार कथा ऐकण्यासाठी आल्या होत्या. कथेच्या पेंडॉलमध्ये जात असताना गर्दीमधून आलेल्या अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याची पोत चोरली. ही २५.४७० ग्रॅम वजनाची सोन्याची पोत त्यांनी अडीच वर्षांपूर्वी खरेदी केली होती. त्याची त्यावेळची किमत १ लाख ५२ हजार ८७० रुपये होती.

### महत्त्वाचे

## सोनाळा ग्रामपंचायत भरती प्रकरणी चौकशीची मागणी

**▸विदर्भ केसरी। संग्रामपूर।**

तालुक्यातील सर्वात मोठ्या सोनाळा ग्रामपंचायतेमध्ये झालेल्या कर्मचारी भरती प्रकरणी युवकशक्ती ग्रामविकास संघटनेने निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. संघटनेने जिल्हा परिषद बुलढाणा येथील मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांना ६ एप्रिल सोमवार रोजी दिलेल्या निवेदनात आरोप केला आहे की, संबंधित भरती प्रक्रिया शासनाच्या नियमांनुसार पारदर्शक पद्धतीने राबविली गेली नाही. निवेदनानुसार, नियुक्तीसाठी कोणतीही सार्वजनिक जाहिरात प्रसिद्ध केलेली नव्हती, इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया राबविली गेली नाही आणि निवड प्रक्रियेत गुणांकन पद्धती, लेखी परीक्षा किंवा मुलाखत यांसारख्या अधिकृत प्रक्रियेचा अवलंब केलेला नव्हता. यामुळे, संघटनेच्या मते, ही प्रक्रिया पारदर्शकतेच्या तत्त्वांना बाधक ठरली आहे. 'आपले सरकार' पोर्टलवरील माहितीप्रमाणे कोणतीही नवीन भरती प्रक्रिया जाहीर नसली तरी प्रत्यक्षात नियुक्ती झाल्याचा विरोधाभासही निवेदनात नमूद करण्यात आला आहे. युवकशक्ती ग्रामविकास संघटनेने प्रकरणाच्या कायदेशीर तरतुदींचा संदर्भ देत सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित ग्रामसेवक निलंबित ठेवावा आणि दोषी आढळल्यास योग्य प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## विद्यार्थ्यांना थोर पुरुषांच्या जीवनावर आधारित पुस्तकांची भेट

**▸विदर्भ केसरी। कळंब | प्रतिनिधी - विरेंद्र चव्हाण**



कळंब तालुक्यातील मार्कंडा येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणारा एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये थोर व्यक्तींच्या कार्याची ओळख निर्माण व्हावी आणि त्यांच्यापासून प्रेरणा मिळावी, या उद्देशाने मेटीखेडा येथील सामाजिक कार्यकर्ते विशाल सरोदे यांनी हा उपक्रम हाती घेतला. या अंतर्गत कनिष्ठ प्राथमिक मराठी शाळा, मार्कंडा येथे चौथी, पाचवी व तिसरीतील विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित माहितीपूर्ण पुस्तके भेट देण्यात आली. पुस्तक वितरण कार्यक्रमात विशाल सरोदे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यात आली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली उईके (मंगाम) व शिक्षिका शीतल चौधरी उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमाबद्दल शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले.

# 'लक्ष्मी जीनिंग'चा धुरळा

## उद्योग बंद करण्यासाठी नागरिकांचा एल्गार.

**▸विदर्भ केसरी।मूर्तिजापूर प्रतिनिधी.**



तालुक्यातील हातगाव येथील लक्ष्मी जिनिंग प्रेसिंग या उद्योगामुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, हा प्रकल्प तातडीने आणि कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. निवासी क्षेत्रात सुरू असलेल्या या उद्योगाच्या प्रदूषणाने नागरिक मेटाकुटीला आले असून, प्रशासकीय दिरंगाईमुळे आता संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हातगाव येथील गट क्र. १६४/०२ मध्ये हा जीनिंग उद्योग स्थित आहे. विशेष म्हणजे, या उद्योगाच्या दोन्ही बाजूंना (गट क्र. १६४/०१ आणि १६४/०३) अधिकृतरीत्या मंजूर निवासी लेआउट आहेत. परिसरात मोठ्या प्रमाणात घरे, हॉटेल्स आणि गावठाण क्षेत्र असतानाही या ठिकाणी कापूस जिनिंगचे काम सुरू आहे. यामुळे उडणारी धूळ आणि यंत्रांचा प्रचंड आवाज यामुळे लहान मुले व वृद्धांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. नागरिकांनी या त्रासाबाबत प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. यात प्रामुख्याने खालील बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे:

७ मार्च २०१९ रोजीच्या प्रादेशिक प्रयोगशाळा, नागपूरच्या अहवालात प्रदूषणाबाबतचे स्पष्ट संकेत दिले आहेत. ४ नोव्हेंबर २०२१ आणि ३ जानेवारी २०२३ च्या विकास परवानगी आदेशाचा (प्रकरण क्र. NAP-३४/हातगाव/३२/२०२१-२३) दाखला देऊनही प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही.

११ मार्च रोजी नागरिकांनी लक्षवेधी धरणे आंदोलन केले, मात्र प्रशासकीय यंत्रणेला अद्याप जाग आलेली नाही. ७ एप्रिल २०२६ रोजी नागरिकांनी संबंधित कार्यालयात धाव घेतली असता, धक्कादायक प्रकार समोर आला. पटवारीने आपला अहवाल चक्क 'व्हॉट्सॲपवर पाठवल्याची माहिती मिळाल्याने या प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर नागरिकांनी संशय व्यक्त केला आहे.

"एवढ्या गंभीर विषयात कागदोपत्री चौकशी करण्याऐवजी व्हॉट्सॲपवर अहवाल देणे म्हणजे दोषींना पाठीशी घालण्याचा प्रकार आहे," असा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

या प्रकरणातील सर्वात कळीचा मुद्दा म्हणजे प्रशासनाचे दुटप्पी धोरण. ज्या ठिकाणी आधीपासूनच प्रदूषणाचे स्त्रोत असलेला जीनिंग प्रेसिंग उद्योग सुरू होता, तिथे महसूल विभागाने निवासी लेआउटला परवानगी दिलीच कशी? हा निर्णय घेताना नियमांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले का? कोणाच्या दबावाखाली हे लेआउट मंजूर झाले, याची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी आता नागरिक करत आहे

### नागरिकांचा इशारा.


■ प्रशासनाची भूमिका सध्या संशयास्पद वाटत आहे. वारंवार तक्रारी करूनही जर हा उद्योग सील केला जात नसेल, तर आम्हाला तीव्र आंदोलनाशिवाय पर्याय उरणार नाही. संबंधित दोषी अधिकाऱ्यांचीही चौकशी झाली पाहिजे.
संतप्त रहिवासी, हातगाव.

■ आता या प्रकरणात जिल्हा प्रशासन नेमकं काय पाऊल उचलते आणि सामान्य नागरिकांना प्रदूषणातून मुक्त करते का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# अंजनगाव पंचायत समितीत मनरेगाचा बोजवारा

## मनरेगाचे काम थंडावले जिल्ह्याचे अधिकारी देतील का लक्ष

**▸विदर्भ केसरी। संघरतन सरदार**




अंजनगाव सुर्जी पंचायत समिति अंतर्गत एकुण ४९ ग्राम पंचायती आहेत केंद्र आणि राज्य सरकार गावकरी नागरिकांना गावातच काम आणि गावातच दाम उपक्रम आहे दरवर्षी विहीर, पांधन रस्ते शेततळे, फळबाग, वृक्ष लागवड संगोपन घरकुल, गुरांचे गोठे असे विविध योजना शासन मोठ्या स्तरावर राबित राहते. हि योजना राबविताना नागरिकांना कागदपत्रे जुडवताना तारे ची कसरत करावी लागते. कागदपत्रे ग्रामसेवक, रोजगार सेवक, एपीओ , पी टी ओ यांना फाईल कागदपत्रे देवुन पंचायत समिति स्तरावर फाईल धुळखात बसतात. लाभार्थी पंचायत समितीचे उमरडे झिजून चक्कर टाकून परेशान होतात पण तेथे असलेले अधिकारी कर्मचारी यांना कोणताच असा फरक पडत असताना दिसत नाही. फक्त आपला पगार वेळेवर मिळाला पाहिजे याकडे लक्ष राहते.आणि जवळील लाभार्थ्यांचे कामे होत असल्याची तालुक्यात चर्चा आहे . तालुक्यातील पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी मनरेगा विभागातील अधिकारी यांना नागरिकांच्या समस्या कामाबाबत गती द्या असे म्हटले तर अधिकारी माझ्याकडे ते काम नाही असं म्हणत काम झटकत राहतात. नेमके कोणते काम कोणाकडे आहे . कार्यकर्ते संभ्रम मध्ये आहेत.लाभार्थ्यांचे कामे पूर्ण होतात पण त्यांचे हजेरी मस्टर पंचायत समिती मधून निघत नाहीत. लाभार्थी योजना अनुदानाचे रक्कम मिळणार बस या प्रतीक्षेमध्ये दिसत राहते. अंजनगाव पंचायत समिती तालुकास्तरावरील अधिकारी कर्मचाऱ्यांची जिल्ह्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करून कामे एवढे प्रलंबित कसे आहेत हे विचारणा करण्यात यावी व लाभार्थ्यांना न्याय देण्यात यावा. अशी मागणी तालुक्यातून जोर धरत आहे.

# नोकरी मागणारे नाही तर नोकऱ्या देणारे व्हा - दामले

## उद्योग व्यवसाय मार्गदर्शन मेळावा उत्साहात संपन्न

**▸विदर्भ केसरी। मुर्तिजापूर**




अत्यंत प्रतिकुल परस्थित जिद्द आणि कष्टाने आपले जिवन व्यतीत करणाऱ्या ब्राम्हण समाजातील तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता उद्योजक म्हणुन आपली ओळख निर्माण करावी. स्वतः उदयोजक होवुन नोकरी मागणारे नाही तर नोकऱ्या देणारे व्हा असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांनी बुधवार ०८ एप्रिलला केले. येथील सालासार रिसोर्ट येथे सर्व शाखिय ब्राम्हण सभेच्या वतीने आयोजीत उदयोग व्यवसाय मार्गदर्शन मेळावा व सत्कार समारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणुन ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्राम्हण सभा मुर्तिजापूर च्या अध्यक्षा प्रा. लता किडे होत्या. यावेळी उपाध्यक्ष राजाभाऊ बढे सचिव गजानन मोहरीर आदी मान्यवर मंचावर होते.

कार्यक्रमाची सुरवात भगवान परशुरामाच्या प्रतिमा पुजनाने झाली. मुर्तिजापूर ब्राम्हण सभेच्या वतीने आशिष दामले यांचा शाल श्रीफळ व स्मृतिचिन्हे देवुन सत्कार करण्यात आला.

उद्योजक व्यावसायीकांच्या सत्कार समारंभात प्रातिनिधीक स्वरूपात जिल्हा दुध उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रशांत हजारी, कॅटरींग असोशीएशनचे आनंद उपाध्याय, चाहा व्यवसायी विनायक वारे, पुजा बापट, अनिकेत कंझरकर, प्रशांत देवधर, वसंत केळकर, संजय कंझरकर, अजीत कंझरकर, रवि गणोरकर, मनोज पाठक, लता कुर्हेकर, अनघा खानझोडे,माधव फडनाईक, धनंजय गणोरकर, अभिषेक मानोरकर इ. चा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

आपल्या अध्यक्षीय भाषणातुन लता किडे यांनी समाजातील तरुणांनी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेत प्रगती करावी असे आवहन केले. कार्यक्रमाचे संचलन अमीत कंझरकर, मुकुंद दाणी, परीचय संतोष पाठक, प्रास्तावीक ज्ञानेश देशपांडे यांनी तर आभार प्रदर्शन अंजली केसाळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिलीप घोडकी, शंतनु पाठक मिलींद जोत, राहुल मुलमुले, श्रीपाद सालफळे आदींनी परीश्रम घेतले कार्यक्रमाला मोठ्या संखेने समाज बांधवां ची उपस्थिती होती.

# धम्मक्रांती प्रज्ञापर्व 2026 सोहळ्याचे थाटात उद्घाटन!

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**




सम्राट अशोक, महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने धम्मक्रांती प्रज्ञापर्वाचे मोठ्या उत्साहात उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

सर्वप्रथम सम्राट अशोक भगवान गौतम बुद्ध महात्मा फुले छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सामूहिक त्रिशरण पंचशील, संघमित्रा महिला मंडळ व सुजाता महिला मंडळ यांच्या वतीने घेण्यात आले. [या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांचे पुष्पावंती नगरीमध्ये शासकीय विश्रामगृहाचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारकापर्यंत मोठ्या रथामध्ये गाजत वाजत रॅलीमध्ये त्यांचे स्वागत करण्यात आले.] समता सैनिक दलाच्या वतीने डॉ.भीमराव यशवंतराव आंबेडकर यांना सलामी देण्यात आली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास गुलाबी पुष्पहार अर्पण करण्यात आला.. जेसीबी द्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर हे होते तर अध्यक्ष म्हणून तर बाबासाहेब आंबेडकर पुतळा सौंदर्यीकरण समितीचे अध्यक्ष भीमराव दादा कांबळे हे तर धम्मक्रांती 2026 चे अध्यक्ष डॉ. सुनील खाडे सर यांची प्रमुख उपस्थिती होती."2026 या जयंती वर्षात पुसद मध्ये मी पहिल्यांदाच आलो आहे या नगरीमध्ये धम्म क्रांती प्रज्ञापर्व आयोजन समितीच्या वतीने मला पुसदला येण्याचा पहिला सन्मान मिळाला आहे पुढे बोलताना म्हणाले की डॉ. बाबासाहेबांनी टप्प्याटप्प्याने धम्म क्रांतीकडे वळले आणि जीवनाच्या अखेरीस बाबासाहेबांनी धम्माकडे वळून नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर पाच लाख दलितांना पवित्र बौद्ध धमाची दीक्षा देऊ नवक्रांती केली. आजही बहुजन समाजातील वंचित दलित समाज मोठ्या संख्येने बौद्ध धम्मा मध्ये येण्याचे प्रमाण लाखोंनी वाढले आहे. येणाऱ्या काळात शासनाच्या वतीने अनेक सर्वे केल्या जात आहेत आपण त्या सर्वे मध्ये धम्माच्या रखान्यामध्ये माहिती देताना बौद्ध धम्म असे लिहावे व जात असल्यास आपण ज्या जातीतून आला त्या जातीचा उल्लेख करून तो रकाना भरून पूर्ण करावा असे आवाहन धम्मक्रांती प्रज्ञापर्व2026 या सोहळ्याच्या उद्घाटकीय भाषणातून भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनी केले"या धम्म मंचावर प्रामुख्याने उपस्थित,भीमराव यशवंतराव आंबेडकर, भीमराव दादा कांबळे, प्रा. सुनील खाडे सर, डॉ.विठ्ठल खाडे प्राचार्य मुंबई बुद्ध रत्न भालेराव, किशोर दादा कांबळे, मिलिंद जाधव, भोलेनाथ कांबळे,भास्कर पाढेन भारत कांबळे, प्रतिमा वाकळे, इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धम्मक्रांती प्रज्ञापर्व समिती20 26 अध्यक्ष डॉ. प्रा सुनील खाडे सर यांनी केले.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ल.पु. कांबळे व आभार राजेश ढोले यांनी केले.

# पुसदमध्ये ज्ञानाचा उत्सव, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

## भीम आर्मी ने आयोजित केलेल्या स्पर्धा परीक्षेचे केंद्र ठरले पुसद; 2200 विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भीम आर्मी - भारत एकता मिशन यवतमाळ जिल्हा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा – २०२६ ही परीक्षा पुसद येथे यशस्वीरीत्या व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धा परीक्षेत तब्बल २२०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असून परीक्षा ही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्याच दिवशी पेपर व त्याच दिवशी निकाल व त्याच दिवशी बक्षीस वितरण सोहळा या पद्धतीने पारदर्शकपणे घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने परीक्षेत सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. मोहिनीताई इंद्रनील नाईक नगराध्यक्ष न . प.पुसद या होत्या, तर उद्घाटक म्हणून प्रा. डॉ. सुनील खाडे अध्यक्ष धम्मक्रांती प्रज्ञापर्व 2026 हे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक भीम आर्मी महाराष्ट्र प्रदेश संघटक अशोकराव भालेराव यांनी कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे सन्मानचिन्ह देऊन स्वागत केले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून आशाताई साखरे (सरपंच, बोरगडी), विठ्ठल खडसे, शिक्षण सभापती न.प.पुसद, भारत कांबळे तालुका अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा पुसद राजकुमार भगत, विशाल डाके, प्रा. प्रदीप धबाले, डॉ. राहुल भगत, अमोल खडसे, किशोर मुजमुले, शरद ढेंबरे, प्रफुल भालेराव, सुखदेव भगत, डॉ. प्रियंका खाडे, ॲड. अमोल भालेराव जितेंद्र कांबळे, रुखमण्णा बादावार, मारोती कोटरंगे, बिरकुरवार सर, राजेश अघम, ऋषी चौधरी, विश्वास भवरे, धनराज कांबळे, प्रफुल भालेराव, तायडे मॅडम, नेहा भगत,, सुरेश कांबळे, आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी आवड निर्माण करणे, आत्मविश्वास वाढवणे व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञानाची आवड निर्माण करून देणे हा होता. या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह पालकांकडूनही मोठा प्रतिसाद मिळाला. परीक्षा केंद्र संचालक म्हणून नरेंद्र दादाराव पाटील यांनी उत्तम नियोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपाल चव्हाण यांनी केले तर आभार राजकुमार भगत यांनी व्यक्त केले . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भीम आर्मी संघटनेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते तथा सर्व मित्र परिवारांनी अथक परिश्रम घेतले. यशस्वीपणे स्पर्धा परीक्षा संपन्न केल्याबद्दल सर्व स्तरातून आयोजकांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# महेश शिंदे यांचा सेवानिवृत्ती सत्कार

**▸विदर्भ केसरी। कळंब तालुका प्रतिनिधी:-विरेंद्र चव्हाण**




कळंब :-ग्रामीण रुग्णालय कळंब येथे कार्यरत असलेले कनिष्ठ लिपिक श्री. महेश शिंदे हे वयोमानानुसार दि. ३१ मार्च २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या दीर्घ, प्रामाणिक व कर्तव्यदक्ष सेवेला मानाचा मुजरा देण्यासाठी ग्रामीण रुग्णालय अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने नुकताच सेवानिवृत्ती सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधीक्षक डॉ. मधुकर मडावी हे होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी वैद्यकीय अधीक्षक डॉ. उमेश मडावी, सेवानिवृत्त वैद्यकीय अधीक्षक डॉ. मधुकर राठोड, डॉ. प्रशांत कनाके, ग्रामीण रुग्णालय रूग्ण कल्याण समिती माजी अशासकीय सदस्य अशोक उमरतकर, डॉ. ठमके, डॉ. डोंगरे, श्री. भुजबळ सर, डॉ. ताकसांडे मॅडम, श्री. मोटे, डॉ. वानखेडे, श्री. शेरजे, श्री. अवस्थी यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारंभात श्री. महेश शिंदे यांचा सहपत्नी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या सेवाकाळात त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे, शिस्तबद्धपणे व जबाबदारीने काम करत रुग्णालय प्रशासनात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या निवृत्तीमुळे रुग्णालयातील एक अनुभवी, कर्तव्यदक्ष व सर्वांना आपुलकीने साथ देणारा कर्मचारी सेवेतून निवृत्त झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.यावेळी प्रमुख अतिथी डॉ. उमेश मडावी यांनी आपल्या भाषणात श्री. शिंदे यांच्या सेवाभावी वृत्तीचा गौरव करताना, त्यांनी अनेक वर्षे रुग्णालयाच्या कामकाजात उल्लेखनीय योगदान दिल्याचे सांगितले. तर डॉ. मधुकर राठोड यांनी श्री. शिंदे यांच्या कार्यकुशलतेचे, संयमी स्वभावाचे व सहकाऱ्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचे कौतुक केले.अध्यक्षीय समारोपात डॉ. मधुकर मडावी यांनी श्री. महेश शिंदे व त्यांच्या परिवारास पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद व यशाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, श्री. शिंदे यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा व सेवाभाव यांचा आदर्श निर्माण केला असून त्यांच्या कार्याची आठवण सर्वांना कायम राहील. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अलोणे मॅडम यांनी केले.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रेवन परकटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. जिचकार सर, गायकवाड, नगराळे, नावी, ब्राम्हणे तसेच ग्रामीण रुग्णालय कर्मचारीवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमात उपस्थितांनी श्री. महेश शिंदे यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांना निरोप दिला.

# जिल्ह्यात मका-ज्वारी खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी !

**▸विदर्भ केसरी। बाळापूर**



तालुक्यातील उरळ बु.सह पंचक्रोशीत मोठ्या प्रमाणात उन्हाळी तसेच रब्बी हंगामात मका व ज्वारी पिकांचे उत्पादन घेतले जाते. मात्र, शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत (MSP) मिळत नसल्याने त्यांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. खरीप हंगामासाठी पैशांची गरज असताना पणन व्यवस्थेअंतर्गत खरेदी केंद्रे सुरू होत नसल्याने शेतकऱ्यांना आपला शेतमाल कमी दरात विकावा लागत असून, प्रति क्विंटल हजार ते दीड हजार रुपयांपर्यंत तोटा सहन करावा लागत आहे.

तालुक्याच्या ठिकाणी खरेदी केंद्रे सुरू करण्याऐवजी ज्या भागात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते, त्या पंचक्रोशीतच खरेदी केंद्रे सुरू केल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळू शकतो. सध्याच्या परिस्थितीत अनेक शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकत असल्याने, किमान आधारभूत किंमतीत शेतमालाची खरेदी होणे अत्यंत गरजेचे आहे. यासंदर्भात शेतकऱ्यांच्या वतीने जिल्हा पणन अधिकारी, अकोला यांना निवेदन देण्यात आले. शेतकरी हित लक्षात घेऊन तातडीने सकारात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या वेळी निवेदन देताना शेतकरी पुत्र गोपाल पोहरे, रवी गावंडे, क्षितिज पोहरे, देवानंद साबळे, योगेश ढोरे, संदीप मेटांगे, सुनिल निळकंठ, साहिल मोरखडे, दिनेश बांगर, शंकरराव ताठे आदी शेतकरी उपस्थित होते.





» Selected

## गडचिरोली: माडिया संस्कृतीचे दर्शन घडविणारा 'पेनकरसाळ' उत्सव लाहेरी येथे उत्साहात संपन्न



भामरागड: तालुक्यातील मौजा लाहेरी येथे ५ ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत माडिया आदिम जमातीचा पारंपरिक 'पेनकरसाळ' उत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. दंडकारण्यातील या वैशिष्ट्यपूर्ण उत्सवात हजारो आदिवासी बांधवांनी सहभागी होऊन आपल्या आराध्य देवतांचे आशीर्वाद घेतले. माडिया भाषेत 'पेन' म्हणजे देव आणि 'करसाळ' म्हणजे खेळ किंवा उत्सव. आपल्या पूर्वजांना देव मानून त्यांच्या सन्मानार्थ जो सोहळा साजरा केला जातो, त्याला 'पेनकरसाळ' संबोधले जाते. माडिया आणि गोंड समाजात गोत्रानुसार वेगवेगळे देव मानले जातात. या उत्सवाच्या माध्यमातून आपल्या पूर्वजांचे स्मरण करून त्यांच्या परंपरांचा वारसा पुढच्या पिढीकडे सोपवला जातो.

धार्मिक विधींसोबतच सामाजिक मंथन

हा उत्सव केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित नसून, यात सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडते. उत्सवादरम्यान समाजातील विविध प्रश्नांवर आणि सामुदायिक बाबींवर सखोल चर्चा करून महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. काही ठिकाणी हा उत्सव दरवर्षी होतो, तर काही गावांमध्ये परंपरेनुसार ३ ते १२ वर्षांच्या अंतराने याचे आयोजन केले जाते. सांस्कृतिक वारशाचे जतन अतिअसुरक्षित आदिम जमात म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माडिया समुदायाच्या जीवनात या उत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. लाहेरी येथे झालेल्या या तीन दिवसीय उत्सवात पारंपरिक वाद्ये, नृत्य आणि विधींच्या माध्यमातून आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडले. हा उत्सव माडिया समाजाच्या श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक म्हणून ओळखला जातो.

## अ.भा.आदिवासी विकास परिषद तर्फे नवनियुक्त आदिवासी काँग्रेस जिल्हाध्यक्ष गावळ यांचा सत्कार



देसाईगंज : अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, गडचिरोली यांच्या वतीने नवनियुक्त आदिवासी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष इंजि. माधवराव गावळ यांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. इंदिरा गांधी चौक येथील विश्रामगृहात आयोजित कार्यक्रमात आदिवासी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार डॉ. देवराव होळी यांच्या मार्गदर्शनाखाली गावळ यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी आदिवासी विकास परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्ष पुष्पलता कुमरे, जिल्हा महासचिव उमेश उईके, महिला जिल्हा सचिव विद्या दुग्गा, जिल्हा संघटक पवन गेडाम, जिल्हा सचिव सुरज मडावी, जिल्हा महिला सहसचिव तनुजा कुमरे, शहर अध्यक्ष आरती कोल्हे, निकिता कुमरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान आदिवासी समाजाच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच त्यावर लवकरात लवकर उपाययोजना करण्याबाबत विचारमंथन करण्यात आले.

# स्वर्गरथ दुरुस्तीत 9.63 लाखांचा खर्च!

## गडचिरोली नगर परिषदेत गैरव्यवहाराच्या चर्चांना उधाण...!

विदर्भ केसरी। विनोद सेलोटे

गडचिरोली :- नगर परिषदेतील गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेल्या प्रशासकीय कारभारावर आता गंभीर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्यामुळे या कालावधीत 'अधिकारी राज' सुरू होते. याच काळात विविध विकासकामांमध्ये अनियमितता झाल्याच्या चर्चांना उधाण आले असून, स्वर्गरथाच्या दुरुस्तीसाठी करण्यात आलेल्या तब्बल ₹9.63 लाख खर्चामुळे हे प्रकरण चांगलेच गाजू लागले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नगर परिषदेच्या स्वर्गरथाच्या दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करण्यात आला. मात्र, केवळ दुरुस्तीवर एवढी मोठी रक्कम खर्च केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. "वाहनाच्या देखभाल - दुरुस्तीसाठी एवढा प्रचंड खर्च म्हणजे 'मलिदा' लाटण्याचा प्रकार नाही का?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरात सुरू असलेल्या चर्चेनुसार, जवळपास ₹9 लाख 63 हजार इतका





खर्च दुरुस्तीवर करण्यापेक्षा थोडा अधिक निधी खर्च करून नवीन स्वर्गरथ खरेदी करणे अधिक किफायतशीर ठरले असते, असा मुद्दा पुढे येत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या निर्णयक्षमतेवर तसेच आर्थिक नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता स्वर्गरथाची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. नगर परिषद प्रशासनाकडून ही सेवा उपलब्ध करून दिली जात असली तरी, वाहनाच्या एकूण किंमतीच्या 50 ते 75 टक्के रक्कम जर केवळ दुरुस्तीवर खर्च होत असेल, तर त्या निर्णयाची योग्यताच संशयास्पद ठरत आहे. दरम्यान, एवढ्या मोठ्या खर्चासाठी आवश्यक असलेली निविदा प्रक्रिया (टेंडर) राबविण्यात आली होती का, याबाबतही संशय व्यक्त केला जात आहे. काँग्रेसच्या एका नगरसेवकांनी या संपूर्ण खर्चाची सविस्तर माहिती मागविली असून, कोणत्या बाबींवर किती रक्कम खर्च झाली याची आकडेवारी लवकरच समोर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासकीय कार्यकाळात आणखी किती कामांमध्ये अनियमितता झाली आहे, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

### सखोल चौकशी व्हावी:श्रीकांत देशमुख

नगरसेवक श्रीकांत शरदराव देशमुख यांनी या प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया देताना म्हटले की, शहरासाठी स्वर्गरथाची आवश्यकता नक्कीच आहे; मात्र दुरुस्तीवर झालेला खर्च अवास्तव आहे. या खर्चात थोडी भर घातली असती, तर नवीन वाहन खरेदी करता आले असते. त्यामुळे हा खर्च संशयास्पद असून, त्याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी.

## रोटरी क्लब" च्या माध्यमातून एकात्मतेचा अनुभव देण्याचा प्रयत्न - योगितताई पिपरे



विदर्भ केसरी। गडचिरोली

माणूस जीवनामध्ये दैनंदिन कार्यामध्ये व्यस्त असतो. जीवनात मानसिक तान तणावापासून थोडासा विरंगुळा मिळावा याकरिता रोटरी क्लब नागरिकांना आनंद, उत्साह आणि एकात्मतेचा अनुभव देण्याचा प्रयत्न करीत आहे. असे प्रतिपादन सौ.योगितताई पिपरे भाजपा महिला आघाडी जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष नगरसेविका गडचिरोली यांनी केले. रोटरी क्लब गडचिरोलीच्या वतीने रोटरी मेला, रोटरी उत्सव 2026 चे आयोजन दिनांक 5 एप्रिल ते 8 एप्रिल पर्यंत आरमोरी रोडवरील सुमानंद सभागृह येथे करण्यात आलेले आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी मंचावर रोटरी क्लबचे अध्यक्ष मा. अमितजी सूचक, इनर विल क्लब चे अध्यक्ष वैशालीताई बट्टूवार, सचिव सौ.सरस्वतीताई परतानी उपस्थित होते. अमितजी सूचक, इनर विल क्लब चे अध्यक्ष वैशालीताई बट्टूवार, सचिव, सरस्वतीताई परतानी उपस्थित होते.

## मा. इंजि. पिपरे यांचा जिल्हा सहकारी बोर्डच्या वतीने सत्कार

गडचिरोली :- जिल्हा सहकारी बोर्ड गडचिरोली येथील कार्यालयात आज जिल्हा सहकारी बोर्ड गडचिरोलीची मासिक सभा संपन्न झाली.याप्रसंगी वसंतरावजी मेश्राम अध्यक्ष जिल्हा सहकारी बोर्ड गडचिरोली, श्रीहरीजि कोपुलवार माजी संचालक महाराष्ट्र संघ पुणे, बंडोपंतजी येलावार संचालक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व जिल्हा सहकारी बोर्ड गडचिरोली, श्री.पी.व्ही. तलमले विकास अधिकारी जिल्हा सहकारी बोर्ड गडचिरोली, श्री. आर.एम. भोयर लिपिक जिल्हा सहकारी बोर्ड गडचिरोली, रवींद्र करकाडे व्यवस्थापक जिल्हा मध्यवर्ती सहकारी मुद्रणालय गडचिरोली उपस्थित होते.

## 8 ते 25 एप्रिल दरम्यान अमृतच्या लक्षित गटाचे परिवार सर्वेक्षण!

विदर्भ केसरी। विनोद सेलोटे

चंद्रपूर महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही महाराष्ट्र शासनाची स्वायत संस्था आहे. ज्या खुल्या प्रवर्गातील जातींना कुठल्याही योजनांचा लाभ मिळत नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक-युवती व इतर उमेदवारांच्या सर्वांगिण उन्नतीसाठी विविध प्रशिक्षण व उपक्रम आयोजन करून लाभ मिळवून देण्यात येतो. सद्यास्थितीमध्ये अमृत संस्थेमार्फत लक्षित गटाच्या सर्वांगीण न्नतीसाठी विविध योजनाची अंमलबजावणी करण्यात येते. यात मुख्यत्वे 1. व्यक्तिमत्व विकास, 2. औद्योगिक व उन्नत कौशल्य विकास, 3. रोजगारक्षम कौशल्य विकास, 4. उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसाह्य, 5. स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन, 6. वैयक्तिक व्याज परतावा योजना (उद्योग व्यवसाय वृद्धीसाठी) इत्यादी योजनांचा समावेश आहे.

यासाठी लक्षित गटातील कुटुंबाची संख्या निश्चित करणे, त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे, उपलब्ध स्थानिक संसाधने, उपलब्ध कौशल्य व आवडीनुसार विविध योजना तयार करण्यासाठी लक्षित गटातील परिवाराचे सर्वेक्षण केले जाणार आहे. सर्वेक्षणाचा कालावधी 8 एप्रिल ते 25 एप्रिल 2026 आहे. या माध्यमातून लक्षित गटातील जास्तीत जास्त कुटुंबापर्यंत अमृत संस्थेच्या विविध योजना व उपक्रमाची माहिती पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. कालावधीत अमृत संस्थेचे प्रतिनिधी लक्षित गटाशी संपर्क करणार आहेत. तरी लक्षित गटातील जास्तीत जास्त व्यक्तींनी नोंदणी करून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमृतचे जिल्हा व्यवस्थापक विक्रममोहन पांडे यांनी केले आहे.

## आदर्श महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेवर एक दिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

विदर्भ केसरी। प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज:- स्थानिक आदर्श कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील रोजगार मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षा विभाग वतीने "स्पर्धा परिक्षा विश्व : स्वरूप आणि नियोजन" या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे यांच्या मार्गदर्शनात आयोजित या कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. निहार बोदेले हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. आकाश पिंपळकर, संचालक, शौर्य अकॅडमी, देसाईगंज, प्रा. अमोल बोरकर, इतिहास विभाग, आदर्श महा. , प्रा. तेजस आत्राम इंग्रजी विभाग, आदर्श महा. उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे मार्गदर्शक श्री. आकाश पिंपळकर म्हणाले की, "ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षा बाबत भिती दूर करून नियोजन पुर्वक व सातत्यपूर्ण अभ्यास केल्यास स्पर्धा परिक्षेत यशस्वी होऊ शकतात." त्यांनी कार्यशाळेला उपस्थित विद्यार्थ्यांना बॅंकिंग क्षेत्रातील IBPS, SBI, RRB, NABARD, LIC, SEBI अंतर्गत भरण्यात येणारे विविध पदे तसेच कर्मचारी निवड आयोग (SSC) व रेल्वे अंतर्गत भरण्यात येणारे पदे, या परीक्षांचा अभ्यासक्रम, निवड प्रक्रिया, परीक्षेचे स्वरूप, अभ्यासाचे नियोजन, अभ्यासाची पुस्तके या बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्रा. अमोल बोरकर यांनी कार्यशाळेला उपस्थित विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग अंतर्गत भरण्यात येणारे विविध



पदे तसेच परीक्षांचा अभ्यासक्रम, निवड प्रक्रिया, परीक्षेचे स्वरूप, अभ्यासाचे नियोजन, अभ्यासाची पुस्तके या बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तर केंद्रीय लोकसेवा आयोग तर्फे IAS, IPS, IFS, CRPF, CISF, ITBP, BSF अंतर्गत भरण्यात येणारे विविध पदांच सविस्तर माहिती प्रा. तेजस आत्राम यांनी विद्यार्थ्यांना दिली तसेच परीक्षांचा अभ्यासक्रम, निवड प्रक्रिया, परीक्षेचे स्वरूप, अभ्यासाचे नियोजन, अभ्यासाची पुस्तके या बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या मुख्य मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेत यशस्वी होण्याचे कानमंत्र दिले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्पर्धा परिक्षेत यशस्वी होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली पाहिजे. नियोजनपूर्ण अभ्यास व समर्पणवृत्तीने केलेले परिश्रम हेच या परीक्षांमध्ये यशस्वी होण्याचे मंत्र आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना डॉ. निहार बोदेले म्हणाले की, "स्पर्धा परीक्षेतील यश हे नियोजन पूर्ण अभ्यास आणि परिश्रमावर अवलंबून तर आहेच परंतू विद्यार्थ्यांचे आत्मविश्वास, सकारात्मक वृत्ती आणि अभ्यासातील सातत्यता हे या परीक्षांमध्ये यश प्राप्त करण्यात फार मोलाचे ठरते. "कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्र संचालन प्रा. प्रियंका ठाकरे तर उपस्थितांचे आभार प्रा. योगेश तूपट यांनी मानले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी, महाविद्यालयातील संपूर्ण प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

## अमृतच्या लक्षित गटाचे परिवार सर्वेक्षण

विदर्भ केसरी। चंद्रपूर

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही महाराष्ट्र शासनाची स्वायत संस्था आहे. ज्या खुल्या प्रवर्गातील जातींना कुठल्याही योजनांचा लाभ मिळत नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक-युवती व इतर उमेदवारांच्या सर्वांगिण उन्नतीसाठी विविध प्रशिक्षण व उपक्रम आयोजन करून लाभ मिळवून देण्यात येतो. सद्यास्थितीमध्ये अमृत संस्थेमार्फत लक्षित गटाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विविध योजनाची अंमलबजावणी करण्यात येते. यात मुख्यत्वे 1. व्यक्तिमत्व विकास, 2. औद्योगिक व उन्नत कौशल्य विकास, 3. रोजगारक्षम कौशल्य विकास, 4. उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक अर्थसाह्य, 5. स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन, 6. वैयक्तिक व्याज परतावा योजना (उद्योग व्यवसाय वृद्धीसाठी) इत्यादी योजनांचा समावेश आहे. यासाठी लक्षित गटातील कुटुंबाची संख्या निश्चित करणे, त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे, उपलब्ध स्थानिक संसाधने, उपलब्ध कौशल्य व आवडीनुसार विविध योजना तयार करण्यासाठी लक्षित गटातील परिवाराचे सर्वेक्षण केले जाणार आहे.

## गोकुळनगरमध्ये हिट अँड रन : काळ्या जीपने कार, दुचाकी आणि सायकलींना दिला भीषण धक्का..!

विदर्भ केसरी। गडचिरोली

शहरातील गोकुळनगर भागात ६ एप्रिल रोजी दुपारी २:३० वाजताच्या सुमारास भरधाव काळ्या रंगाच्या जीपचालकाने उभ्या वाहनांना जोरदार धडक दिली. या हिट अँड रनमध्ये एका कारसह दोन दुचाकी आणि ५ सायकलींचे सुमारे ३७ हजार रुपयांचे नुकसान झाले. धर्मेंद्र दयाल रामटेके (५५) यांनी आपल्या घरासमोर कार (क्र. एमएच ३४ सीआर-६७९८) पार्क केली होती. शेजारील अभ्यासिकेबाहेर विद्यार्थ्यांच्या दोन दुचाकी आणि ५ सायकली उभ्या होत्या. काळ्या जीपने या सर्व वाहनांना चिरडत भीषण धडक दिली. धडकेचा आवाज ऐकून विद्यार्थी बाहेर आले असता, चालक चामोर्शी रोडच्या दिशेने सुसाट निघून गेला. या अपघातात रामटेके यांच्या कारचे बंपर व टायर फुटले, तर दोन दुचाकी आणि सायकलींचे मोठे नुकसान झाले. विशेष म्हणजे जीपच्या धडकेत सायकलचे चाकही क्षतिग्रस्त झाले होते. याप्रकरणी गडचिरोली ठाण्यात अज्ञात जीपचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस ताबडतोब आरोपीचा शोध घेत आहेत, असे पो. नि. विनोद चव्हाण यांनी सांगितले. परिसरातील मेडिकल स्टोअरच्या सीसीटीव्हीमध्ये काळ्या रंगाची जीप वेगाने जाताना कैद झाली आहे. या सीसीटीव्हीच्या आधारावर चालकाचा माग काढणे सुरू आहे.

## जाफराबाद ग्रामपंचायतीत भ्रष्टाचाराचा कळस

## चौकशी प्रलंबित असतानाच लाखो रुपयांची देयके अदा!

विदर्भ केसरी। विनोद सेलोटे

गडचिरोली :- सिरोंचा तालुक्यातील जाफराबाद ग्रामपंचायतीमध्ये आर्थिक अनियमितेचा आणि भ्रष्टाचाराचा गंभीर प्रकार समोर आला आहे. ग्रामपंचायतीच्या कारभारावर आधीच गंभीर तक्रारी असताना आणि जिल्हा परिषद स्तरावर चौकशी सुरू असताना, प्रशासनाने नियमांना बगल देऊन लाखो रुपयांची नवीन देयके काढल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जाफराबाद ग्रामपंचायतीमध्ये पथदिव्यांच्या (स्ट्रीट लाईट) कामात मोठा आर्थिक घोटाळा झाल्याची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांच्याकडे करण्यात आली होती. या प्रकरणाची चौकशी सुरू असतानाच, काम पूर्ण होण्याच्या १० दिवस आधीच १ लाख ९० हजार रुपयांचे बिल काढण्यात आले.





या धक्कादायक प्रकाराबाबत गटविकास अधिकारी (BDO) यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाला कोणत्याही प्रकारची भीती नसल्याचे चित्र दिसत आहे. तक्रार प्रलंबित असतानाच पुन्हा ९०,००० रुपये (LED बल्ब खरेदी) आणि ४८,९४२ रुपये (ZP शाळा व अंगणवाडी रॅम्प काम) अशी एकूण लाखो रुपयांची देयके 'XV फायनान्स कमिशन' अंतर्गत घाईघाईने काढण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, ज्या कामांची देयके काढली गेली, त्यातील तांत्रिक मूल्यांकन आणि गुणवत्तेवर ग्रामस्थांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ग्रामसभेला ग्रामसेवकाचा नकार? ग्रामपंचायतीमध्ये सुरू असलेल्या या भ्रष्टाचारामुळे नागरिकांमध्ये असंतोष असून, या विषयावर चर्चा करण्यासाठी वॉर्ड क्र. १ च्या सदस्या सुजाता श्रीनिवास सडमेक आणि स्थानिक नागरिकांनी १० मार्च २०२६ रोजी ग्रामसभा आयोजित करण्याची मागणी केली होती. मात्र, ग्रामसेवक यांनी ग्रामसभा घेण्यास नकार दिल्याने भ्रष्टाचाराला पाठीशी घातले जात असल्याची शंका नागरिक व्यक्त करत आहेत. रस्त्याच्या कामात प्रत्यक्ष मूल्यांकनापेक्षा १८,८०० रुपये जास्त दाखवून अपहार केल्याचा ठपका चौकशी अहवालात आहे. नियमबाह्य देयके: केंद्रचालकास शासनाच्या परवानगीशिवाय २,०६,००४ रुपयांचे मानधन अदा करण्यात आले. अंदाजपत्रकाचा अभाव: हातपंप बांधकामासाठी १,१३,३८३ रुपये खर्च केले, परंतु त्याचे कोणतेही तांत्रिक रेकॉर्ड उपलब्ध नाही. महसुलाचे नुकसान: रॉयल्टी आणि टीडीएस (TDS) स्वरूपातील ४१,१५९ रुपये कपात न केल्याने शासनाचे नुकसान झाले आहे. कठोर कारवाईची मागणी या प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९(१) नुसार दोषी सरपंच आणि संबंधित अधिकाऱ्यांचे पद रद्द करून त्यांच्याकडून अपहारित रकमेची वसुली करावी, अशी मागणी पत्रकार आणि तक्रारदार आनंद बापू आशा यांनी प्रशासनाकडे केली आहे. आता जिल्हा प्रशासन या उघड भ्रष्टाचारावर काय कारवाई करते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

> "जेव्हा भ्रष्टाचाराची v तात्काळ कारवाई व्हायला हवी."
> — तक्रारदार व ग्रामस्थ

## भामरागड तालुक्यात 'जागतिक आरोग्य दिन' उत्साहात साजरा!

### आरोग्य शिबिरे व जनजागृतीवर भर

विदर्भ केसरी। भामरागड

'सर्वांसाठी आरोग्य' हा संदेश घेऊन ७ एप्रिल रोजी भामरागड तालुक्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये 'जागतिक आरोग्य दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने तालुक्यात विविध ठिकाणी आरोग्य शिबिरे, प्रभातफेरी आणि मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करून जनतेला आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. धोडराज येथे प्रभातफेरी व क्षयरुग्णांना मदतीचा हात धोडराज येथे कार्यक्रमाची सुरुवात गटविकास अधिकारी (BDO) श्री. वानखेडे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रभातफेरीने करण्यात आली. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी घोषणांच्या माध्यमातून आरोग्याविषयी जनजागृती केली. श्री.



वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता आणि चांगल्या आरोग्यदायी सवयींबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे, सामाजिक बांधिलकी जपत धोडराज येथील एका क्षयरुग्णाला (TB Patient) श्री. वानखेडे यांनी स्वतः दत्तक घेतले. यावेळी संबंधित रुग्णाला त्यांच्या हस्ते 'प्रोटीन किट'चे वाटप करण्यात आले. रुग्णांनी नियमित उपचार आणि सकस आहार घेतल्यास आजारावर लवकर मात करता येते, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. पल्ली येथे आरोग्य शिबिर पल्ली येथील आरोग्य केंद्रात विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात परिसरातील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजना, आयुष्मान भारत कार्ड आणि लसीकरणाचे महत्त्व यावर सविस्तर माहिती देण्यात आली. यशासाठी कर्मचाऱ्यांचे परिश्रम हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये श्री. गवारे सर, श्री. मोडक सर, श्री. गावडे सर, श्री. माशाखेतरी सर, श्री. चलाख सर यांच्यासह सर्व आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका आणि समुदाय आरोग्य अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



# पोखरांतर्गत योजनांचा लाभ घेत 96 हजार शेतकऱ्यांनी बदलले शेतीचे चित्र

अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोखरा) योजनेचा पहिला टप्पा समाप्त झाला आहे. या पहिल्या टप्प्यात जालना जिल्ह्यातील दहा वीस नव्हे तब्बल ९६ हजार शेतकऱ्यांनी विविध योजनांचा लाभ घेत शेतीचे चित्र बदलले आहे.यासाठी शासनाच्या वतीने तब्बल ७८६ कोटींचा निधीही खर्च करण्यात आला आहे. याद्वारे शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होण्यास मदत होत असून, लवकरच पोखराचा दुसरा टप्पाही सुरू केला जाणार आहे. २०१८ साली पोखरांतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी शासनाकडून सुरू करण्यात आली होती. योजनेच्या माध्यमातून शेतीपयोगी साधने आणि साहित्य योजनांचा लाभ देण्यात आला आहे. जून महिन्यात योजनेचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून, यामध्ये जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शेडनेट हाउस, ठिंबक सिंचन, तुषार सिंचन, फळबाग लागवड, शेततळे, मत्स्यपालन, नवीन विहीर, पंप संच, पाइप, पॉली टनेल, हरितगृह, शेडनेट हाउसमधील लागवड साहित्य, पॉली हाऊस, गांडूळ खतनिर्मिती, बंदिस्त शेळीपालन, बीजोत्पादन, मधुमक्षिकापालन, रुंद वाफा व सरी तंत्रज्ञान अवलंबण्यास प्रोत्साहन, रेशीम उद्योग, विहीर पुनर्भरण, कृषी यांत्रिकीकरण, शेततळे अस्तरीकरण व इतर योजनांचा लाभ घेतला आहे. योजनेत शासनाने ७६८ कोटी १९ लाख रुपये इतके अनुदान वाटप केले आहे.अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेली नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोखरा) योजनेचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे.

दुसरा टप्पा कधी सुरू होणार

अशी शेतकऱ्यांकडून विचार होत आहे. बजेट प्राप्त होताच दुसरा टप्पा लवकरच सुरू होणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगितले जात आहे.

शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी शासनाच्या वतीने जिल्ह्यात पोखरांतर्गत विविध योजना राबविण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील ३६३ गावांतील शेतकऱ्यांना याचा लाभ मिळाला आहे. त्याद्वारे विविध कामे शेतीत झाली असून, शेतकऱ्यांना सक्षम होण्यास त्याची मदत होत आहे. - जी. आर. कापसे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी.

नवीन विहीर, शेततळ्यामुळे पाण्याची उपलब्धता
पोखरांतर्गत नवीन विहीर, शेततळ्यांची योजनाही राबविण्यात आली आहे. याचा जवळपास तीन हजारावर शेतकऱ्यांनी लाभ घेतला आहे. त्यामुळे संबंधितांना शेतीसाठी पाण्याची उपलब्धता झाली आहे.

याच योजनेंतर्गत ठिबक, तुषारचाही लाभ शेतकऱ्यांनी घेतला असून, कमी पाण्यात अधिक उत्पन्न घेण्यास त्यामुळे मदत झाली आहे. विविध घटक योजनांद्वारे शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.



| शेडनेट हाऊस | ठिबक सिंचन | तुषार सिंचन | फळबाग लागवड | शेततळे | मत्स्यपालन | नवीन विहीर | पंप संच |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२४७ २६६.४३ | ३८५८३ ३०९.६३ | २१७७७ ४०.१२ | १७९१४ ६१.११ | २८७८ ६१.०१ | १२९२ ३.२९ | २५८ ६.२४ | ३०५५ ४.४९ |
| **पाइप** | **पॉली टनेल** | **गांडूळ खतनिर्मिती** | **बिजोत्पादन** | **रेशीम उद्योग** | **विहीर पुनर्भरण** | **कृषी यांत्रिकीकरण** | **इतर** |
| २४३३ ४.७३ | ११ १.१८ | ३२ ०.०२ | ७६० ०.६९ | १०१० ७.१९ | २७ ०.०३ | ५९१ ४.५ | ९७ ०.९४ |

# राज्यातील महिलांना मिळणार वर्षाला तीन गॅस सिलेंडर

मुंबई : केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या राज्यातील सुमारे ५२.१६ लाख लाभार्थ्यांना तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांच्या कुटुंबाना वर्षाला ३ गॅस सिलिंडरचे पुनर्भरण मोफत उपलब्ध करून देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे व तसा शासन निर्णय केला आहे.

या योजनेचे पात्रता निकष
- या योजनेचा लाभ मिळण्यासाठी गॅस जोडणी महिलेच्या नावाने असणे आवश्यक आहे.
- राज्यातील प्रधानमंत्री उज्वला योजनेंतर्गत पात्र असलेले लाभार्थी या योजनेसाठी पात्र असणार आहेत.
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस पात्र असलेल्या लाभार्थ्यांचे कुटुंब या योजनेस पात्र असणार आहे.
- एका कुटुंबात शिधापत्रिकेनुसार केवळ एक लाभार्थी या योजनेस पात्र असेल.
- तसेच फक्त १४.२ किलेग्रॅम वजनाच्या गॅस सिलेंडरची जोडणी असलेल्या गॅस ग्राहकांना ही योजना लागू असेल.

या योजनेची कार्यपद्धती
- प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना गॅस सिलिंडरचे नियमित वितरण हे तेल कंपन्यांमार्फत करण्यात येते. “मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना” अंतर्गत द्यावयाच्या 3 मोफत गॅस सिलिंडलचे वितरणही तेल कंपन्यामार्फत करण्यात येईल.
- केंद्र सरकारच्या ३०० रुपये अनुदाना व्यतिरिक्त राज्य शासन ५३० रुपये प्रति सिलिंडर इतकी रक्कम लाभार्थ्यांचा थेट बँक खात्यात जमा करण्यात येईल.
- तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थी यांना प्रति सिलिंडर ८३० रुपये रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे बँक खात्यात जमा करण्यात येईल.
- या योजनेत ग्राहकास एका महिन्यास एकापेक्षा जास्त सिलिंडरसाठी अनुदान देण्यात येणार नाही.
- दि. १ जुलै २०२४ रोजी पात्र होणाऱ्या लाभार्थ्यांनाच योजनेचा लाभ देण्यात येईल.
- दि. १ जुलै २०२४ नंतर विभक्त केलेल्या शिधापत्रिका या योजनेस पात्र ठरणार नाहीत.

या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी व लाभार्थी निवडीसाठी मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी एक, प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हास्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे शहरासाठी नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती असेल, तर संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती कार्यरत असेल.

या दोन्ही समिती ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेच्या लाभार्थ्यांचे (रेशन कार्डनुसार) कुटुंब निश्चित करेल. योजनेतील लाभार्थ्यांची द्विरुक्ती होणार नाही याची काळजी घेईल. निकषांची पूर्तता करणाऱ्या लाभार्थ्यांची आधार प्रमाणित अंतिम यादी, आधार संलग्न बँकखाते क्रमांकासह निश्चित करेल. याशिवाय योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी व ग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी राज्यस्तरीय समितीही कार्यरत असणार आहे.



# स्वाधार योजनेसाठी पोर्टल सुरु, ऑनलाईन अर्ज करता येणार

नागपूर : अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा करण्यात येते. या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सन २०२४-२५ मध्ये स्वाधार योजनेचा HTTPS://HMAS.MAHAIT.ORG या पोर्टलद्वारे नागपूर जिल्ह्यात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरता येणार आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी हे संकेतस्थळ सुरु करण्यात आले असून अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करुन सदर अर्जाची प्रत सहाय्यक आयुक्त. समाज कल्याण, नागपूर येथे सादर करण्यात यावे, असे जाहिर आवाहन सुकेशिनी तेलगोटे, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, नागपूर हे करीत आहे. अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भावन शासकीय आय. टी. आय समोर, श्रध्दानंद पेठ, दीक्षाभूमी चौक, नागपूर येथे संपर्क साधावा.

### स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी निकष

या योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौद्ध या प्रवर्गाचा असावा. विद्यार्थ्याने जात प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. या योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज केलेल्या व प्रवेश न ६ मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांचा या योजनेच्या निवडीसाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल. विद्यार्थ्याने स्वतःचा आधार क्रमांक त्याने ज्या राष्ट्रीयकृत शेडयूल्ड बँकेत खाते उघडले आहे त्या खात्याशी संलग्न करणे बंधनकारक असेल.
विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न २.५० लाखापेक्षा जास्त नसावे.
महानगरपालिकेच्या हद्दीपासून ०५. किमी. परिसरात असलेल्या महाविद्यालयात, शिक्षण संस्थेत शिकत असलेले विद्यार्थी या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र असतील.
विद्यार्थी इयत्ता अकरावी, बारावी आणि त्यानंतरचे उच्च शिक्षण घेणारा असावा. इयत्ता दहावी व बारावी मध्ये किमान ५० टक्के गुण असणे अनिवार्य आहे.

# धान्य वितरण बंद : गरिबांच्या धान्याची काळजी कुणाला ?

भंडारा : ई-पॉस मशीनमध्ये गत दोन महिन्यांपासून सर्व्हर डाऊनची समस्या उद्भवत आहे. त्यावर अजूनही तोडगा निघाला नसल्याची स्थिती आहे. त्यामुळे रेशन लाभार्थ्यांना धान्य वितरण करताना अडचणी येत आहे. वितरण बंद असल्याने लाभार्थ्यांना स्वस्त धान्य दुकानांवर हेलपाटे मारावे लागत आहे. त्यामुळे गरिबांच्या धान्याची काळजी कोणाला, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

स्वस्त धान्य दुकानातील वितरण व्यवस्था ठप्प पडली आहे. आता प्रशासनाने ऑफलाइन धान्य वितरण करण्याच्या सूचना दुकानदारांना दिल्या असल्या तरी ऑनलाइनचा तगादा स्वस्त धान्य दुकानदारांना दिल्याने त्यांच्या द्विधा मनस्थिती आहे. भंडारा जिल्ह्यात एकूण ८९० रेशन दुकाने आहेत. या दुकानांअंतर्गत २ लाख ४८ हजार ३३५ कार्डधारक आहेत. या माध्यमातून जिल्ह्यात एकूण १० लाख ४ हजार ८९ लाभार्थी संख्या आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर मजुरी बुडवून दुकानांसमोर रांगेत उभे राहून धान्य घेत असतात. मात्र तासनतास उभे राहूनही ई- पॉस मशीन सर्व्हर डाऊन झाल्याने सुरू होत नाही. त्यामुळे कंटाळून ग्राहकांना परत जावे लागत आहे. याबाबत रेशन दुकानदारांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, तहसीलदार यांना पत्र देऊन अवगत केले आहे. परंतु यावर तोडगा निघाला नाही. त्यामुळे मशीन तहसील कार्यालयात जमा करण्याचा निर्णय स्वस्त धान्य दुकानदारांनी घेतला आहे.

जिल्ह्यातील ८९० रेशन दुकानदारांना पुरवठा विभागाकडून ई-पॉस मशीन दिल्या आहेत. या मशीनवर लाभार्थीची बायोमेट्रिक ओळख पटवून धान्याचे वितरण केले जाते. मात्र रेंजची अडचण, कधी मशीन चालत नाही तर, कधी लाभार्थीच्या बायोमेट्रिक ओळखीत अडथळा निर्माण होतो. नव्या तंत्रज्ञानामुळे सुरुवातीपासूनच लाभार्थ्यांना समस्यांना सामना करावा लागत आहे.

यासंदर्भात जिल्हा अन्न पुरवठा विभागाच्यावतीने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी जुलैचे वितरण करण्यासाठी कैरी फारवर्डची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. दुकानदारांनी ऑनलाईन वाटप पूर्ण करून घ्यावे, शुक्रवारी दुपारनंतर ही प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

ऑफलाइनचे आदेश पण वितरण किचकट
अडचणी लक्षात घेऊन आता प्रशासनाने ऑफलाइन धान्य वितरण करण्याच्या सूचना



दुकानदारांना दिल्या आहेत. माव ऑफलाइन वितरण केल्यानंतर दुकानदारांना ऑनलाइन प्रक्रिया राबवायची असल्याने ही प्रक्रिया किचकट आहे. त्यामुळे दुकानदार अडचणीत येण्याची शंका दुकानदारांनी व्यक्त केली.

कॅरी फॉरवर्ड पुन्हा सुरू करा
जुलै महिन्यात धान्य वितरण प्रक्रिया रखडल्याने जुलै महिन्याचे धान्य ऑगस्ट महिन्यात वितरित करावे. जुलै व ऑगस्ट असे दोन्ही महिन्यांचे धान्य कॅरी फॉरवर्ड करून लाभार्थ्यांना त्याचे वितरण करावे, अशी मागणी स्वस्त धान्य दुकानदारांसह लाभार्थ्यांनी केली आहे. याकडे प्रशासनाला लक्ष देण्याची गरज आहे.

जिल्ह्यात दरमहा वितरणासाठी ६२ हजार ७० विचेटल धान्याची मागणी केली जाते. जिल्ह्यातील ग्राहक संख्या व रेशन दुकानांची संख्या लक्षात घेता शासनाकडून धान्यांची मागणी केली जाते. गहू अंत्योदय लाभार्थासाठी ६ हजार ६७० क्चिटल तर, प्राधान्य कॉर्डधारकांसाठी ७ हजार ७५० विचेटल, असे एकूण १४४२० क्विंटल, तसेच तांदूळ अंत्योदय लाभार्थ्यांसाठी १६ हजार ६९० विचेटल व प्राधान्य लाभार्थ्यांसाठी ३० हजार ९६० क्विंटलची मागणी केली जाते.

### काय आहे कारण?

गत आठवड्याभरापासून राज्यात पावसाचा कहर सुरु आहे. या पावसामुळे आधार सिडींग होण्यास अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे पॉस मशीनमध्ये तांत्रीक अडचण आली आहे. यामुळे वितरणावर परिणाम दिसून येत आहे.

### ग्राहकांची भूमिका

ई-पॉस मशीनीतील बिघाडाने स्वस्त दुकानदार परत पाठवीत आहेत, चार पाच चकरा मारून झाल्यामुळे आता कंटाळा आला आहे. परिणामी दुकानदारांसोबत वाद होत आहे. सर्व उपस्थित लाभाथ्यापैकी बोटावर मोजण्याइतकेच लाभार्थीचे ठसे लागतात. नंतर प्रक्रीया उप्प पडते.

# टेलर, गवंड्यांना नाही मिळणार १५ हजार रुपयांचे साधन किट !

गडचिरोली : सर्वसामान्य नागरिकांना पाठबळ देण्यासाठी सरकार विविध योजना राबवत आहेत. पंतप्रधान विश्वकर्मा योजना समाजातील विविध १८ व्यवसाय करणाऱ्या लोकांना त्यांचा पारंपरिक व्यवसाय करताना अर्थसाहाय्य व्हावे यासाठी राबविली जात आहे; परंतु टेलर आणि गवंडी लाभार्थ्यांना प्रशिक्षण काळात प्रतिदिन ५०० रुपयांचे विद्यावेतन, प्रमाणपत्र आणि साधने घेण्यासाठी १५ हजार रुपयांचा लाभ देण्यास स्थगिती दिली आहे.

पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ घेण्यासाठी, अर्जदारांना श्रमिक पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा लागतो. अर्जदारांच्या त्रिस्तरीय पडताळणीनंतर त्यांना योजनेचा लाभ दिला जातो. ग्रामीण आणि शहरी संस्थांसाठी पडताळणीसाठी स्वतंत्र यंत्रणा आहेत. ग्रामीण भागात पडताळणीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडे आली आहे. त्यामुळे शहरी भागात प्रथम स्तरावरील पडताळणी कार्यकारी अधिकारी करतात.

### पीएम विश्वकर्मा योजना

समाजातील पारंपरिक व्यवसाय करण्यासाठी सुरु केलेली आहे. या योजनेंतर्गत समाजातील सर्व जातींना प्रशिक्षणासह कर्ज कमी व्याजदरात उपलब्ध करून



देण्यात येत आहे. दोन टप्प्यात दिले जाते कर्ज स्वतःचा रोजगार निर्माण करण्यासाठी बँकांमार्फत एक लाख ते तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज हमीशिवाय दिले जाते. यावर ५ टक्के व्याज असून, तीन लाख रुपयांची ही रक्कम एक लाख व दोन लाख अशा दोन टप्प्यांत दिली जाते.

### निवडीचे निकष काय?

अर्ज करणाऱ्या व्यक्तीकडे त्याचे जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. योजनेचा लाभ फक्त भारतीय नागरिकांनाच मिळणार आहे. अर्ज करणारी व्यक्ती एकतर कुशल कारागीर किंवा कारागीर असणे आवश्यक आहे.

गवंडी, टेलरला स्थगिती
गवंडी कामे व टेलरची कामे करणारी व्यक्ती ही आधीच प्रशिक्षित असते. त्यामुळे या व्यक्तींना प्रशिक्षण देणे व साहित्य खरेदीसाठी लाभ देण्यास सध्या स्थगिती आहे.

### लाभ काय?

प्रतिदिन ५०० रुपये विद्यावेतन या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना एक आठवड्यापर्यंत मोफत प्रशिक्षण दिले जाते. याकरिता त्यांना ५०० रुपये प्रतिदिन विद्यावेतन दिले जाते.

### प्रमाणपत्र

संबंधित लाभार्थ्यांना एक आठवड्याचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रशिक्षण प्रमाणपत्र दिले जाते. परंतु, आता टेलर व गवंडी यांना हे प्रमाणपत्र देण्यावर स्थगिती आलेली आहे.

### व्यवसाय साधन खरेदीसाठी १५ हजार

लाभार्थ्याने प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याला त्याच्या पारंपरिक व्यवसायासाठी साधने, किट खरेदी करण्यासाठी १५ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य दिले जाते.

अधिकारी म्हणतात..
"पीएम विश्वकर्मा योजनेंतर्गत टेलर व गवंडी यांना प्रशिक्षण काळात विद्यावेतन, प्रमाणपत्र आणि साधने खरेदीसाठी लाभ देण्याबाबत स्थगिती आल्याचे निर्देश शासनाकडून प्राप्त झाले नाही, असे नगर परिषदेतील एका अधिकाऱ्याने सांगितले".